विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष पहिले । अंक सातवा । एप्रिल २०२३



स्वातंत्र्य
समता
बंधुता

# महा. अंनिसचे विविध उपक्रम...




पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याबाबत आवाहन करताना राज्य व जिल्हा पदाधिकारी



वारसा संतांचा, अंधश्रद्धा निर्मूलनाचा या अभियानातर्गत पोस्टर प्रदर्शनावेळी ऊर्जानगर शाखेचे पदाधिकारी व कार्यकर्ते



चमत्कार सादरीकरण करताना दिगंबर कट्यारे आणि विशाल विमल




'लव्ह आझाद' वर मुक्त चर्चा करताना गायत्री लेले, प्रशांत ननावरे आणि आरती नाईक



पनवेल शाखेचे महिलांसाठी 'झेप' शिबिर संपन्न




कागल येथे महा. अंनिस व विवेक वाहिनी अंतर्गत 'होळी लहान पोळी दान' हा उपक्रम



शिंदखेडा येथे विद्यार्थी विज्ञान महोत्सव संपन्न




धुळे जिल्हा बैठकीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर सभागृहाचे उद्घाटन

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे
मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

आम्ही वारस विवेकाचे

**वर्ष पहिले । अंक सातवा**
**एप्रिल २०२३**

## अनुक्रमणिका


- **संपादकीय** ४
- **अभिवादन**
  स्त्री सक्षमीकरणाचा उन्नतीदूत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर/डॉ. तृप्ती थोरात ५
  मध्ययुगातील थोर समाजसुधारक : बसवण्णा / विजय परब ८
  जैन धर्माची पुरातनता आणि आजचे वास्तव! /संजय सोनवणी ११
- **बुवाबाजी**
  धिरेंद्र शास्त्रीचा दिव्य दरबार की चोर दरबार? / नंदकिशोर तळाशीलकर १४
- **विज्ञान विश्व**
  विज्ञान म्हणजे काय?/सुधीर फाकटकर १५
  धूमकेतू / शंकर शेलार १८
- **जनसंवाद**
  वक्तृत्वाचा पाया : मौखिक परंपरा/ प्रा. डॉ. संजय थोरात २१
- **राष्ट्रीय समन्वय**
  बुद्धिवादी फाऊंडेशन, बिहार :
  एक परिचय/ डॉ. रमेन्द्र / अनुवाद- उत्तम जोगदंड २३
- **पुस्तक परिचय**
  महा. अंनिसच्या कार्याचा गौरव करणारी
  'महाराष्ट्राची लोकयात्रा'/ प्रा. नरेश आंबिलकर २६
- **कार्याध्यक्ष संवाद** / माधव बावगे २८
- **खबरबात** / अनिल शोभना वसंत २९
- **वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पाचे महाराष्ट्रभर कार्यक्रम** /
  प्रा. दिगंबर कट्यारे ३५
- **गणितप्रेमी** / सूरज उर्मिला सुनील ३७
- **शब्दकोडे**/ उत्तम जोगदंड ३८


'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhashradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

विज्ञान निर्भयता नीती

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे-पवार
  किशोर बेडकिहाळ
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे
- **मुखपृष्ठ**
  सचिन भोसले
- **स्वागतमूल्य** : ₹ २०/-
- **पृष्ठ संख्या** : ४०

**वार्षिक वर्गणी**
**४००** रू. (व्यक्तीसाठी) **५००** रू. (संस्थेसाठी)
**वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा :**
संपर्क : अजय भालकर-९३५९०८०८२०
विवेक जागर संस्था,
ICICI बँक, धुळे
**खाते नंबर** : 646301002757
IFSC Code : ICIC0006463
Scan & Pay

# ॥ संपादकीय ॥

आपल्या देशातल्या प्रत्येक नागरिकाला १९५० सालापासून भारतीय संविधानाने समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय ही मूल्येबहाल केलेली आहेत. ही अगदी अलिकडची घटना असली तरी त्यामागे थोर संत आणि समाजसुधारकांनी या मूल्यांसाठी केलेल्या संघर्षाचा मोठा इतिहास आहे. अशा महामानवांमध्ये बसवण्णा, क्रांतिवीर ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश होतो. या तीनही महामानवांची या एप्रिल महिन्यात जयंती येते.

बसवण्णा याची अनुभव मंटप ही संकल्पना वर्तमान संसदीय संकल्पनेचा पायाच होती असे म्हणावे लागेल. अनुभव मंटपामध्ये समानता पाळली जात होती आणि सर्व जाती, धर्माच्या लोकांना यात मुक्त प्रवेश होता. इथे आपले विचार मुक्तपणे व्यक्त करण्याची मुभा होती आणि त्यावर गंभीरपणे चर्चा व्हायच्या. अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी परंपरा यावर बसवण्णा यांनी कठोर प्रहार केला आणि लिंगायत धर्म स्थापन करुन एका नव्या सामाजिक क्रांतीची सुरुवात केली. त्या काळात त्यांनी आंतरजातीय विवाह देखील लावले. परंतु हे सनातनी प्रवृत्तीच्या लोकांना सहन होणे शक्य नव्हते. त्यांनी बसवण्णा आणि त्यांचे अनुयायी यांचा छळ करून समतेवर आधारित समाज निर्माण करण्यात कसे अडथळे आणले हा इतिहास आहे.

क्रांतिवीर ज्योतिबा फुले यांनी धर्माची अत्यंत कठोर चिकित्सा करून त्यामध्ये वंचितांचे केले जाणारे शोषण, अन्याय, अत्याचार यावर त्यांनी अक्षरशः कोरडे ओढले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली आणि शिवजयंती सुरू केली. त्यांना त्यांच्या कार्यात पत्नी सावित्रिमाई यांची साथ लाभली आणि त्यांनी भारतीय उपखंडातील धर्माने शिक्षणापासून वंचित ठेवलेल्या समस्त स्त्रियांना शिक्षणाचे दरवाजे उघडे करून दिले. 'मुलगी शिकली, प्रगती झाली' या आज लोकप्रिय असलेल्या वाक्यप्रचाराचा खरा अर्थ त्या काळात ज्योतिबा आणि सवित्रीमाई यांनी प्रत्यक्ष उदाहरणाने दाखवून दिला होता. परंतु त्याच्या या कार्यात देखील सनातनी प्रवृत्तींनी अडथळे आणलेच. एवढेच नाही तर त्यांची हत्या करण्याची योजना देखील आखली होती.

अस्पृश्यतेचा कलंक माथ्यावर घेऊन शतकानुशतके नरकतुल्य, पशूतुल्य, गुलामीचे जीवन जगणाऱ्या, अत्याचाराच्या अंधकारात बुडालेल्या कोट्यावधी लोकांना समतेचा प्रकाश दाखवणारे महापुरुष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. अस्पृश्यतेचे चटके त्यांनी स्वतः अगदी बालपणापासून भोगले होते आणि उच्च शिक्षण घेतल्यावर देखील भोगावे लागले. चवदार तळ्यापासून ते काळाराम मंदिरापर्यंत त्यांनी आंदोलने केली. आपल्याला आपल्याच धर्माकडून समानतेची, मानवतेची वागणूक मिळावी यासाठी आंदोलने करावी लागणे हे खरे तर त्या धर्मासाठी लांछनास्पद असायला पाहिजे. पण धर्माच्या पोटातले पाणी काही डॉ. बाबासाहेबांच्या आंदोलनांनी हलले नाही. काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन अयशस्वी झाल्यावर त्यांना जाणीव झाली की या धर्मात राहून समता, मानवता, न्याय कधीही मिळणार नाही आणि मग त्यांनी प्रतिज्ञा केली की मी या धर्मात जन्मलो तरी या धर्मात मरणार नाही. १९५६ साली त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारून ती प्रतिज्ञा खरी करून दाखवली, तोच मार्ग वंचित बांधवांना दाखवला. त्यापूर्वी, भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून त्यांनी केवळ शूद्र, अस्पृश्य, महिला यांच्यासाठीच नव्हे तर समस्त भारतीयांसाठी मूलभूत अधिकार प्रदान करणारी, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय देणारे संविधान लिहले. धार्मिक, जातीय, प्रांतिक, भाषिक विविधतेने नटलेल्या आणि त्या विषयी टोकाच्या अस्मिता असलेल्या देशातील जनतेला या संविधानाने एका सूत्रात बांधून ठेवले.

या महापुरुषांच्या संघर्षावर, त्यागावर, विचारांवर आणि संवैधानिक मूल्यांवर उभ्या असलेल्या देशात आज मात्र त्यांच्या विचारांना, लोकशाहीला आणि संवैधानिक मूल्यांना सुरुंग लावला जात असतांना दिसत आहे. धार्मिक कट्टरतेचे चटके भोगणाऱ्या आपल्या शेजारच्या देशांपासून कसलाही धडा न घेता आपल्याकडेही धार्मिक कट्टरतेला खतपाणी घातले जात आहे. यातून देशाच्या एकतेला आणि एकात्मतेला धोका निर्माण झालेला आहेच. परंतु विज्ञानाचा देखील बळी दिला जात आहे. बुवाबाजीला ऊत आला आहे. अशा भीषण वातावरणात सर्व विवेकी लोकांना आपले काम करायचे आहे. सध्या आपली ताकद क्षीण वाटत असली तरी या ताकदीला सत्याचे, विज्ञानाचे आणि तर्काचे अधिष्ठान लाभलेले आहे. आपल्या सोबत या महापुरुषांचे आणि शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे विचार आहेत. या विचारांचा ध्वज हाती त्यांना अभिप्रेत असलेला समाज, देश घडविण्यासाठी लढूया. तेच त्यांना त्यांच्या जयंती निमित्त खरे अभिवादन ठरेल.

विवेकाचा आवाज बुलंद करूया.

**अतिथी संपादक** : उत्तम जोगदंड

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



# स्त्री-सक्षमीकरणाचा उन्नतीदूत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. तृप्ती थोरात, इस्लामपूर**
**८९९९२०१७६६**

भारतीय समाज हा वैविध्यपूर्ण जाणिवांचे, संमिश्र संस्कृतींचे, धार्मिक, भाषिक आणि प्रांतीय विविधतेचे बलाढ्य आगर आहे. या आगारभोवती अनेक प्रथा, परंपरा, रूढी, चालीरीती यांच्या धाग्यांचे नानाविध कोश विणलेले आहेत. वास्तविक पाहाता 'कोश' ही संकल्पना निसर्गाच्या नवनिर्मितीचे सृजनशील रूप आहे. पण या ठिकाणी उल्लेख केलेले 'कोश' हे मानवनिर्मित व सोयीस्कररीत्या बनवले गेले आहेत; जे या निसर्गनियमांच्या विरोधात काम करत आहेत. या मानवनिर्मित कोशांची परिणती इतकीच आहे की, याच समाजातले काही लोक या कोशांच्या ऊबदार धाग्यांची ऊब घेत आहेत तर, काहींच्या गळ्याभोवती याच कोशांचे धागे जीव गुदमरेपर्यंत करकचून आवळले गेले आहेत. ज्यांचा जीव गुदमरतो आहे त्या उपेक्षित वर्गाचा मुक्तिदाता म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जगभर ओळखलं जातं.



मनुवादी व्यवस्थेने निर्माण केलेल्या विषमतेविरोधात समतेचे हत्यार घेऊन सामाजिक रणांगणावर निकराने झुंज देणारा योद्धा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. शतकानुशतके आपले अस्तित्व आणि आपली ओळख हरवलेल्या स्त्रीवर्गाला आत्मभान आणि आत्मशोधाची दृष्टी आपल्या विचार व कृतीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिली. भारतासारख्या पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व मान्य केलेल्या समाजात स्त्री-पुरुष लिंगभेदावर आधारित विखंड कायम ठेवण्यासाठी या विषमतेला जात, धर्म आणि वर्णव्यवस्थेच्या विकारी विचारसरणीचा आधार दिला गेला आणि त्याआधारे समस्त स्त्रीवर्गाला शक्तिहीन करण्याचे षड्यंत्र रचून ते आमलात आणले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्माला आले नसते, तर अजून किती स्त्रियांच्या पिढ्या या मनुचक्रात सापडून मारल्या गेल्या असत्या, याची कल्पनाही करवत नाही.

सध्याच्या परिस्थितीत सबंध भारताच्या विविध राज्यांतील अनेक मंदिरांच्या गाभाऱ्यात महिलांचा प्रवेश आजही नाकारला जातो. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणारा सामाजिक न्याय आजही कोसो दूर आहे, या विदारक वास्तवाची जाणीव होते, म्हणूनच समस्त भारतीय स्त्रियांच्या उत्थानासाठी आंबेडकरांनी केलेल्या कार्याचे व्यापक आकलन करण्यासाठीचा हा छोटासा प्रयत्न या लेखाच्या निमित्ताने करत आहे.

मानवजातीचा इतिहास जितका पुरातन आहे, तितकाच स्त्रियांवरील अत्याचाराचा इतिहासही पुरातन आहे. 'मनुस्मृती'सारख्या ग्रंथांनी स्त्रियांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक अधिकार नाकारले होते. इतकेच नव्हे, तर योनिशुचित्वाच्या नावाखाली बालविवाह, सतीप्रथा, जरठविवाह, विधवा पुनर्विवाहाला बंदी, केशवपन यांसारख्या प्रथांच्या माध्यमातून स्त्रियांच्या लैंगिकतेवर बंधने आणण्याचे सर्वतोपरी प्रयत्न झाले. चारित्र्यशुद्धतेच्या, योनीशुचितेच्या भ्रामक कल्पना रंगवून केवळ स्त्री स्वातंत्र्याचा संकोच केला नाही, तर स्त्रियांच्या माणूसपणाच्या, मानवीमूल्याचा देखील तिरस्कार केला. वेगवेगळ्या सणवार, समारंभातील मानपानाच्या आधारे 'पतिव्रता' व 'सौभाग्यवती' यासारख्या निरर्थक संकल्पनाचे गौरवीकरण करून त्या समाजमनावर ठळकपणे बिंबविण्यात आल्या. दुसऱ्या बाजूला याच पांढरपेशी संकल्पनांनी समस्त भारतीय समाजातील स्त्रियांना शोषणाच्या गर्तेत अमानुषपणे ढकलून दिले.

महिलांचे प्रश्न आणि त्यांच्या अधिकारासाठीचे लढे उभारण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२४-२५ च्या दरम्यानच सुरुवात केली होती. परंतु धर्माच्या ठेकेदारांनी आंबेडकरांच्या या कार्याला सातत्याने विरोध केला. तरीही या विरोधाला आपल्या असामान्य बुद्धिचातुर्याने झुगारून देत आंबेडकरांनी आपल्या प्रत्येक राजकीय आणि सामाजिक चळवळीत स्त्रियांना जाणीवपूर्वक सामावून घेतले. याची पायाभरणी झाली ती सन १९२७ च्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाने. चवदार तळ्याच्या सत्याग्रहात महिलांचा लक्षणीय सहभाग होता. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकांच्या आस्थेचे प्रश्न सोडविण्यासाठी लढे न उभारता त्यांच्या अस्तित्वाचे प्रश्न सोडविण्यासाठीचे लढे उभारण्यावर भर दिला होता. कारण तेच प्रश्न जीवन-मरणाचे खरे प्रश्न होते.

१९३०ला नाशिकमध्ये काळाराम मंदिराच्या प्रवेशाचा लढा सत्याग्रहाच्या मार्गाने उभारला गेला होता. तेव्हा या लढ्यात पुरुषांप्रमाणे स्त्रियांनीही निःसंकोचपणे सहभाग घेतला. काळाराम मंदिराच्या सत्याग्रहात अटक होणारी पहिली तुकडी ही स्त्रियांची होती. गीताबाई गायकवाड यांनी या लढ्यात महिलांच्या तुकडीचे नेतृत्व केले होते.

१४ ऑगस्ट १९३१ रोजी कोट येथील सर कासवजी जहांगीर हॉलमध्ये झालेल्या एका सभेमध्ये समस्त अस्पृश्य समजल्या गेलेल्या स्त्रियांनी गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी काय करावे, याबाबतचे मार्गदर्शन करताना ते म्हणतात की, ''आमच्या स्त्रियांनी आपल्या राहाणीमानामध्ये व इतर व्यावहारिक गोष्टींमध्ये आमूलाग्र सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. आपल्या अंगावरील कथला-पितळेच्या दागिन्यांचा प्रथम त्याग केला पाहिजे. नेसण्यासवरण्यात स्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांच्यामध्ये जो प्रघात घडत आहे, तोच आपणही कायम ठेवला पाहिजे. आपण स्वावलंबनाच्या आधारे हवी ती क्रांती घडवून आणू शकतो.'' या उदाहरणावरून हे स्पष्टपणे जाणवते की, मनोधैर्य खचलेल्या, रंजलेल्या, गांजलेल्या, वंचित समाजाला डॉ. बाबासाहेबांचे आश्वासक शब्द हे नवसंजीवनी देणारे ठरले. त्यानंतर २० एप्रिल १९४० मध्ये बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली एक महिला परिषद पार पडली. या परिषदेत दलित महिलांसाठी असेंबल्लीमध्ये राखीव जागा असाव्यात; तसेच प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सैनिक दले स्थापन करण्यात यावीत; जेणेकरून या महिलांच्यामध्ये आत्मसंरक्षण व स्वावलंबनाची मूल्ये रुजवली जातील, यासाठी ठराव करण्यात आले.

भारतीय स्त्रियांसाठी त्यांनी केलेलं कार्य आधुनिक भारताच्या इतिहासाला क्रांतिकारी वळण देणारं ठरलं. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ कायदेपंडित, अर्थतज्ज्ञ, इतिहासकार, संस्कृतीचे अभ्यासक नव्हते, तर ते सुजाण समाजशास्त्रज्ञ देखील होते. त्यांनी पारंपारिक भारतीय समाजाला लागलेला विषमतेचा रोग बरा करण्यासाठी या समाजाचा सूक्ष्म अभ्यास केला होता. अनेक दुर्लक्षित घटकांच्या उन्नतीकडे त्यांचे बारीक लक्ष होते. याचेच उदाहरण म्हणजे समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर पडलेल्या व समाजाने अमान्य केलेल्या व्यवसायाची चरितार्थासाठी निवड करून देहविक्री करणाऱ्या महिलांना आंबेडकर म्हणतात की, ''स्त्री-जात ही समाजाचा अलंकार आहे. स्त्रियांच्या शीलावर कुळाचा नावलौकिक अवलंबून असतो. आपल्या मुलाबाळांचा, कुळाचा विचार करता आपण या मलीन आयुष्यक्रमाचा त्याग करून आपण आपले शारीरिक स्वास्थ्य जपण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.''

बाबासाहेबांना चांगल्या प्रकारे जाणीव होती की, समाजातील नेमक्या कोणत्या वर्गातील स्त्रियांच्या वाट्याला हा मलीन आयुष्यक्रम येतो? आणि आर्थिक दुर्बलता हे त्याचे एकमेव कारण आहे. महिलांची ही दयनीय नकारात्मक परिस्थिती बदलायची असेल, तर स्त्रीशिक्षणाशिवाय व स्त्रियांच्या आर्थिक सक्षमीकरणाशिवाय पर्याय नाही, ही बाब ते चांगल्याप्रकारे जाणून होते म्हणून त्यांनी शासकीय नोकऱ्यात महिला आरक्षणाची तरतूद केली.

उपेक्षित वर्गातील महिलांना चरितार्थासाठी रोजंदारीवर जावे लागे. त्याठिकाणी ठेकेदार किंवा मुकादमांकडून त्यांचे शोषण केले जाई, ही बाब निदर्शनास आल्यानंतर त्यांनी वेगवेगळ्या कायदेशीर तरतुदी करून श्रमिक, कष्टकरी महिलांना संरक्षण देण्यासाठी वेगवेगळे कायदे केले. महिलांना पगारी रजा, बाळंतपणासाठी चार आठवड्यांची पगारी रजा, प्रसूती भत्ता, कामाच्या ठिकाणी पाळणाघराची सोय, कामाच्या तासांबाबत तरतूदी, कामगार विमा, स्त्री-कामगाराला पुरुष- कामगाराच्या बरोबरीने वेतन आणि ते मिळत नसेल तर कामगार आयुक्ताकडे तक्रार करण्याचा

अधिकार, असे अनेक अधिकार स्त्रियांना मिळवून देण्यासाठी ते अहोरात्र झटले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावेळी 'सरप्लस वुमन' म्हणजे 'अतिरिक्त महिला' ही संकल्पना मांडली होती. विधवा पुनर्विवाहाला विरोध, जोगतीण, देवदासी, मुरळी, बहुपत्नीविवाहाची पद्धत यांसारख्या कुप्रथांमुळे समाजात स्त्री-पुरुष अनुपातामध्ये असमानता दिसून येते. यातूनच अतिरिक्त महिला ही संकल्पना जन्म घेते. पतीच्या निधनानंतर किंवा तत्सम नानाविध कारणांमुळे एकट्या पडलेल्या स्त्रियांसाठी त्यांनी ही संकल्पना वापरली व या स्त्रियांचे पुनर्वसन करण्यासाठी कायदेशीर, संविधानिक मार्गांची तरतूद करून ठेवली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याचा परमोच्च बिंदू म्हणजे ११ एप्रिल, १९४७ रोजी संविधान सभेत आग्रहपूर्वक मांडलेले, ९ भाग, १३९ कलम आणि ७ परिशिष्टात विभागलेले 'हिंदू कोड बिल'. हिंदूधर्मातील कायदे हे ईश्वरप्रणित नाहीत, तर ते समाजाच्या बदलत्या गरजांशी सुसंगत असावेत, असे बाबासाहेबांचे मत होते. भारतीय स्त्रियांच्या दर्जाबाबत असणारी अनिश्चितता व असुरक्षितता नष्ट करण्यासाठी त्यांनी हिंदू कोड बिलाची निर्मिती केली होती.

निसर्गाने माणसाला दिलेला मेंदू हीच राष्ट्रीय संपत्ती आहे. तिचा वापर देशाच्या प्रगतीसाठी व्हावा, असा बाबासाहेबांचा आग्रह होता. परंतु निरर्थक धर्मग्रंथ आणि कालबाह्य रूढी, परंपरांच्या आहारी जाऊन लोकसंख्येचा निम्मा भाग व्यापणाऱ्या स्त्रियांच्या मेंदूचा, बुद्धीचा आपण वापरच होऊ देत नाही. त्याच्या मेंदूवर पर्यायाने त्यांच्या विचारस्वातंत्र्यावर बंधने घालून आपणच आपली प्रगती खुंटवत आहोत, ही बाब बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल सादर करताना निदर्शनास आणून दिली. या क्रांतिकारी हिंदू कोड बिलातील तरतुदी पुढीलप्रमाणे होत्या. १) आंतरजातीय विवाहाला कायदेशीर मान्यता. २) एकपत्नीत्वाचा पुरस्कार. ३) स्त्रियांना घटस्फोट मागण्याचा अधिकार. ४) स्त्रियांना पोटगीचा हक्क. ५) स्त्रियांना उत्तराधिकारी असण्याचा हक्क. ६) स्त्रियांना वडिलांच्या संपत्तीत अधिकार. ७) स्त्रियांना मूल दत्तक घेण्याचा अधिकार. ८) विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता. ९) स्त्रीला स्वतःचा वारस ठरविण्याचा अधिकार. १०) अल्पवयीन मुलांचे पालकत्व आईकडे ठेवण्याची तरतूद. ११) पतीच्या संपत्तीत महिलांना अधिकार... इत्यादी.

हिंदू कोड बिलाचे महत्त्व विशद करताना बाबासाहेब एके ठिकाणी म्हणतात, ''पार्लमेंटपुढील हिंदू कोड बिल ही एक महत्त्वपूर्ण घटना होती व ती या देशातील कोणत्याही अधिवेशनात विचारात घेतली गेली नव्हती. एवढेच नव्हे, तर पार्लमेंटमध्ये यापूर्वी व यापुढेही येणाऱ्या कोणत्याही कायद्याची बरोबरी हिंदू कोड बिलाबरोबर करता येणार नाही. इतके त्याचे महत्त्व आहे. हिंदू समाजातील, वर्गावर्गातील उच्च-नीच भेद तसेच कायम ठेवून केलेले कोणतेही निव्वळ आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे कायदे म्हणजे शेणाच्या ढिगाऱ्यावर महाल उभे करण्यासारखे आहे. ही घटनेची थट्टा आहे'' (संदर्भ- डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे, खंड २०).

मध्ययुगीन सामंती मूल्यांना गाडून स्वातंत्र्य आणि समता या लोकशाही मूल्यांवर आधारित असलेले नवजीवन भारतीय स्त्रियांना मिळावे, अशी प्रत्येक तरतूद हिंदू कोड बिलात करण्यात आली होती. परंतु ११ एप्रिल १९४७ ते २७ सप्टेंबर १९५१ पर्यंत चार वर्षांच्या काळात अनेक वेळा चर्चेस येऊनसुद्धा तत्कालीन राजकीय नेत्यांनी आपल्या राजकीय हितसंबंधांपोटी हे बिल मंजूर होऊ दिले नाही. हे बिल पारित करण्यासाठी बाबासाहेबांनी आपली उभी राजकीय कारकिर्द पणाला लावली. भारतीय स्त्रियांचे समाजातील स्थान बळकट करणारे हिंदू कोड बिल मंजूर न झाल्याने बाबासाहेबांनी उद्वेगाने कायदेमंत्रीपदाचा राजीनामा देऊन जणू मनुवाद्यांच्या धर्मगादीलाच लाथाडले.

यानंतर भारतात जे जे स्त्रीसबलीकरणाचे कायदे झाले त्याचे पितृत्व निःसंकोचपणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्याकडे जाते. कारण काळानेच बाबासाहेबांचे योगदान मान्य केले आहे. जात, धर्म, लिंगभेद, परंपरा यांसारख्या मूल्यहीन घटकांमुळे भारतीय स्त्रियांच्या 'बोन्साय' बनलेल्या आयुष्याला व्यापक दिशा देऊन परिवर्तनसन्मुख बनविण्याचे काम करणाऱ्या उन्नतीदूत आणि समतादूत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन.

(लेखिका सामाजिक कार्यकर्त्या आहेत.)

●



# मध्ययुगीन थोर समाजसुधारक : बसवण्णा

विजय परब, मुंबई
९८६९०७७४६२

भारतीय समाज हा धर्मप्रधान आणि धर्माधिष्ठित समाज आहे. इथे कोणतेही बदल अथवा परिवर्तन धर्माचा आधार घेतल्याशिवाय होऊ शकत नाहीत. आपला समाज जातिव्यवस्था मानणारा आहे. त्यालाही धर्माचाच आधार आहे. कधी काळी जातिव्यवस्था ही कामाच्या स्वरूपावरून ठरत असेलही; पण या जातिव्यवस्थेचे रूपांतर, जात ही जन्मावरून ठरू लागण्यात झाले. यातून जातीची उतरंड ठरवली गेली. समाजाचे उच्च-नीच जातीत विभाजन झाले. याचा फायदा उच्च वर्गाला झाला. सगळी समाजरचनाच भेदभावावर आधारित होती. या समाजरचनेत माणसाला कर्तृत्व दाखवण्याची संधी नव्हती. ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे सर म्हणतात, ''शूद्रांचं काम फक्त वरच्या वर्गाची सेवा करणे हेच होतं, आणि त्या कामाचा मोबदला शून्य असे.'' धर्माच्या नावाने धर्ममार्तंड जे सांगत होते त्यापेक्षा त्यांचे आचरण विपरित होते. त्यात दुटप्पीपणा आणि ढोंगीपणा होता. तत्कालीन समाजात कर्मकांडांचे माजलेले स्तोम, देवापुढे बळी दिले जाणारे प्राणी, अर्थहीन पाठांतर या सर्व बाबींमुळे सामान्य माणूस त्रस्त झालेला होता. धर्माचे मूळ सूत्र हरवून गेलेले होते. महात्मा बसवण्णांचे कार्य लक्षात येण्यासाठी ही परिस्थिती लक्षात घेतली पाहिजे.



भारतीय समाजाला कोणताही विचार धर्माच्या आधारे सांगितला म्हणजे पटतो. धर्माचे हे वास्तव ज्यांनी ज्यांनी लक्षात घेतले ते ते सर्वजण भारतीय समाजात परिवर्तन घडविण्यात यशस्वी झाले. धर्माचा आधार न घेता केवळ बुद्धीच्या अथवा विज्ञानाच्या आधाराने या समाजात बदल होत नाहीत, हे काल-परवापर्यंत तरी आपल्याला दिसून येत होतं. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही अस्पृश्य समाजात बदल घडविण्यासाठी बौद्ध धर्माचा आधार घ्यावा लागला. धम्मचक्रप्रवर्तन करून त्यांनी दलित समाजात नव्या प्रेरणा जाग्या केल्या.

११०५ साली कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावी बसवण्णांचा जन्म झाला. वयाच्या आठव्या वर्षी उपनयन संस्कार करताना, आपल्या मोठ्या बहिणीचा उपनयन संस्कार अगोदर करावा, असे सांगितले असता, त्यांना पंडितांनी सांगितले की, ''स्त्री ही शूद्र असल्यामुळे तिचा उपनयन संस्कार होऊ शकत नाही.'' बसवेश्वर म्हणाले की, ''स्त्री शूद्र असेल तर तिच्यापोटी जन्म घेणारा मी उच्च कसा असेन?'' असे म्हणून त्यांनी उपनयन संस्कार नाकारला. त्याकाळी कर्मकांडाच्या विरोधात आवाज उठविणाऱ्यांना वाळीत टाकले जात होते. आपल्या क्रांतिकारक विचारांचा त्रास आपल्या आईवडिलांना होऊ नये बसवेश्वरांनी वयाच्या आठव्या वर्षी गृहत्याग केला. शैव परंपरेचे केंद्र असलेल्या कुडल संगम येथे ईशान्य मुनींच्या आश्रमात आले. येथे त्यांनी विद्याभ्यास केला. धर्मशास्त्रांचा अभ्यास करताना धर्मग्रंथातील तत्त्वज्ञान आणि प्रचलित समाजव्यवस्था यातील भयंकर तफावत त्यांना आढळून आली. मंदिरात फक्त विशिष्ट लोकांनाच मिळणारा प्रवेश, धर्माच्या नावाने होणारे शोषण त्यांना नकोसं वाटू लागलं. धर्म, पंथ, जात, वर्ण, लिंगभेदाने छिन्नविछिन्न झालेल्या समाजास एकसंध करण्याकरिता समानतेचे प्रतीक असलेल्या इष्टलिंगाचा आविष्कार त्यांनी घडवून आणला. इष्टलिंग धारण करणारी प्रत्येक व्यक्ती लिंग बनते. तोच आजचा लिंगायत धर्म. मंदिरातील देव धनिकांचा असतो म्हणूनच त्यांनी प्रत्येकाचा देव प्रत्येकाजवळ दिला. या देवाची पूजा

करण्यास कोणाचेही बंधन नाही, वेळेचेही बंधन नाही. अवडंबर नाही, सुतक नाही, भेदभाव नाही, सोवळे-ओवळे नाही.

बसवण्णा मंगळवेढा येथील राजा बिज्वलाकडे कारकून म्हणून रुजू झाले. प्रामाणिकपणा व सतत काहीतरी वेगळे करायचा प्रयत्न केल्यामुळे प्रधानपदापर्यंत त्यांनी मजल गाठली. अनिष्ट रूढी, परंपरा यातून समाजाला मुक्त करण्याचा ध्यास त्यांनी घेतला. बिज्वलराजाची राजधानी कल्याणला आल्यानंतर बसवण्णानी लोकशाहीचा पुरस्कार करणारी जगातील पहिली संसदप्रणाली म्हणजेच अनुभवमंटप स्थापन केला. सर्व भेद बाजूला सारून प्रत्येक व्यक्तीला अनुभवमंटपमध्ये मुक्त प्रवेश देण्यात येत असे. प्रत्येक व्यक्ती आपआपले रोजचे काम करून धर्माबाबत अनुभवण्यात चर्चा करत असत. अल्लमप्रभूंच्या अध्यक्षतेखाली ७७० सभासद होते. त्यात ७० स्त्रिया होत्या. या अनुभवमंटपचे काम आजच्या संसदप्रणालीप्रमाणे चालत असे. त्यात सर्व सभासदांना आपले मत मांडण्याचा अधिकार असे, समान अधिकार होते. अनुभवाला प्रमाण मानले जात होते.

बसवेश्वरांना लहानपणापासून धार्मिक गोष्टींची आवड असली, तरी कर्मकांडात रस नव्हता. भक्तीतील सच्चेपणा त्यांना आवडे. हिंसेची व कर्मकांडाची त्यांना चीड होती. बाह्य अवडंबरापेक्षा अंत:करणाची शुद्धता, कायक म्हणजे कामातील निष्ठा आणि सर्वांविषयी समभाव हे त्यांच्या आचरणाचे वैशिष्ट्य होते. लहानपणापासून त्यांना शिवाची प्रीती आणि भक्ती होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात लहानपणापासून श्रेष्ठत्वाची चिन्हे दिसून येत होती. स्वतंत्र व विचारी अशी विचक्षणवृत्ती, अंधश्रद्धेला विरोध आणि सामान्य माणसांविषयी-विशेषत: गरिबांविषयी असलेली कणव, तसेच प्राणिमामात्रांविषयी अपार करुणा, ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची असाधारण आणि अनन्यसाधारण अशी वैशिष्ट्ये होती. भक्ती, निष्ठा, मानवता, दया, करुणा आणि सर्वांविषयी प्रेम आणि समभावना हे त्यांच्या स्वभावाचे विशेष होते. समता, सद्‌भाव, सदाचरण, सत्यनिष्ठा असे सारे गुण त्यांच्यामध्ये होते. इतके असूनही स्वतःच्या मोठेपणाचा त्यांना थोडाही अभिमान अथवा गर्व नव्हता.

इ. स. ११४० मध्ये स्थापन केलेल्या अनुभवमंटपाद्वारे लिंगायत धर्माची घटना आकारास आली. अनुभवमंटप ही धर्मसभा म्हणजे खऱ्या अर्थाने आध्यात्मिक लोकसभा होती. यात भाग घेणाऱ्या प्रत्येकाला आपले विचार कुणाचीही भीडभाड न ठेवता मांडता येत असत. सहभागी सभासदाला आपण कोणते काम करतो व ते काम आपण प्रामाणिकपणे पार पाडतो, हे नमूद करावे लागत असे. अनुभवमंटपात श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव नसे, स्त्री-पुरुष असा भेदभाव नसे. जातीच्याआधारे केलेले भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी रोटीबेटी व्यवहाराची मान्यता देणे आणि त्याप्रमाणे व्यवहार करणे या तत्त्वाद्वारे लिंगायत धर्माने एक मोठी सामाजिक क्रांती केलेली आहे.

लिंगायत चळवळीने कन्नड भाषेला आणि भारतीय साहित्याला दिलेली अनमोल देणगी म्हणजे वचनसाहित्य. आपले अनुभव सर्वांना सांगणे व सर्वांनी ते चर्चा करून, आपल्या धार्मिक आणि सामाजिक नवनिर्मितीला कसे उपयुक्त ठरतील, हा विचार वचनसाहित्यकारांचा राहिलेला आहे. वचनांचा उद्देश त्यांच्या अनुयायांनी श्रद्धा, भक्ती निर्माण करणे हा होता. वचने लिहिण्याचे काम सर्व जातीतील शरणांनी केलेले आहे. पुरुष व स्त्री यांना शरण व शरणी असं म्हटलं जायचं. हे वचनसाहित्य संस्कृत भाषेत न लिहिता सर्वसामान्यांच्या भाषेत म्हणजे कन्नड भाषेत लिहिलं गेलं आहे.

आज आपण एकविसाव्या शतकात वावरत आहोत. वैचारिकदृष्ट्या श्रमाची प्रतिष्ठा आपण मान्य केलेली आहे. भारतीय घटनेतही हे तत्त्व मान्य करण्यात आलेले आहे. शालेय शिक्षणात मूल्यसंस्कारांमध्येसुद्धा हे समाविष्ट केलेलं आहे. तरीही प्रत्यक्ष व्यवहारात आजही बौद्धिक श्रम करणाऱ्यांना जी प्रतिष्ठा आहे, ती कष्ट करणाऱ्यांना नाही, हे जळजळीत वास्तव आहे. भारतीय समाज व्यवस्था ही जन्माधारित जातिव्यवस्था आहे. माणसाचा जन्म झाला की, त्याला जात चिकटते आणि त्याबरोबरच जातीचं श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्व चिकटतं. ज्यांना खालच्या जातीचे समजले जात असे, अशांच्या मनातील न्यूनगंड नाहीसा करणाऱ्यांसाठी आणि त्यांच्या

मनात समानतेची भावना निर्माण करण्यासाठी बसवण्णांनी सर्व जातीतील लोकांना संघटित केले होते. खालच्या समजल्या गेलेल्या जातीतील माणसांच्या घरी जाऊन ते आनंदाने भोजन करत. त्यांनी आंतरजातीय विवाहांचा पुरस्कार केला व तसा विवाहदेखील लावला. त्या काळात आंतरजातीय विवाह लावणं धाडसाचं होतं. ब्राह्मण आणि चांभार यांच्यातील आंतरजातीय विवाहामुळे सनातनी चिडले. त्यांनी राजाकडे केवळ तक्रारच नाही केली, तर खोटेनाटे आरोपही केले. त्यामुळे राजाने त्या दोघा विवाहितांना मृत्युदंडही दिला. यामुळे राजा व वीरशैवांमध्ये युद्धही झाले. बसवण्णांनी बालविवाहास विरोध केला आणि विधवा विवाहास मान्यता दिली. वधू आणि वराने परस्परांना पसंत केले पाहिजे, असेही सांगितले. त्यांनी देवदासी प्रथेला विरोध केला आणि वेश्यांनाही सन्मानपूर्वक लिंगायत धर्मात प्रवेश दिला. त्यांचे सन्मानपूर्वक पुनर्वसन केले. आतापर्यंत स्त्रियांना धर्मग्रंथ ऐकण्याची व वाचण्याचीही परवानगी नव्हती, त्यांना धर्मचर्चेत सहभागी होण्याचा मान मिळाला. त्यामुळे स्त्रियांमधील सुप्त प्रतिभा जागी झाली. त्या धर्मग्रंथात मोलाची भर घालू लागल्या. पुरुषी वर्चस्वाला धक्का देणारे बसवण्णा हे भारतीय परंपरेतील पहिले महापुरुष होते.

बसवेश्वरांच्या काळात वेगवेगळ्या देवांची पूजा केली जात होती. या पूजेसाठी अनेक प्रकारच्या साधनांची जमवाजमव करावी लागत होती. त्यामुळे सर्वांनाच पूजा करता येत नव्हती. बसवेश्वरांनी अशा प्रकारची पूजा नाकारून केवळ मानसिक पद्धतीने करावयाच्या पूजेचा पुरस्कार केला. सर्व वस्तू या ईश्वरनिर्मित आहेत आणि ईश्वराने निर्माण केलेल्या वस्तू, परत ईश्वरालाच परत करणे हे योग्य नाही. तसेच भक्ती ही कोणत्याही जातीतील व्यक्तीला मध्यस्थाविना करता येईल, अशी खात्री दिली. लिंगदीक्षा घेतली की, मंदिरात जाण्याची गरज नाही, कोणत्याही साधनांची आवश्यकता नाही आणि मध्यस्थाचीही गरज नाही. आपणाला भूक लागली असता, आपण आपल्याच हाताने जेवलो तर भूक भागेल, असे त्यांनी वचनात म्हटले आहे. नवस या प्रकाराला त्यांनी विरोध केलेला आहे. त्यांच्या मते, नवस करणे म्हणजे आपण अगोदर काहीतरी चुकीचे करायचे आणि त्याच्या क्षालनासाठी दंड भरण्यासारखे आहे. देव काही व्यापारी नाही. तो काही दिल्याशिवाय प्रसन्न होत नाही, असे म्हणणे चुकीचे आहे. माणसे तीर्थयात्रेला जातात, नदीत स्नान करतात, अशाने पुण्य मिळत नाही. आपले आचरण शुद्ध असावे. वाईट वागणूक करून, तीर्थयात्रा केल्यास पुण्य कसे मिळेल? अशा प्रकारे चुकीचे वर्तन करून ईश्वरभक्तीचा लाभ होत नाही असे ते सांगत. बसवण्णांनी देवलोक, स्वर्गलोक, मृत्युलोक या कल्पना नाकारलेल्या आहेत. आजचा आपला जन्म हाच खरा असून, या जन्मातील जगणे हेच खरे आहे. गतजीवनातील पापपुण्याचा या जन्मातील जगण्यावर काही फरक पडत नाही, हे त्यांनी लोकांना पटवून दिले.

(लेखक महा.अंनिसचे राज्य सरचिटणीस आहेत.)

●



## विनम्र अभिवादन

चमत्कार किती साधू दाखविती । तया पायी मती न ये माझी ।।
ठाणके ठुणके भानामती-खेळ । ऐसे गुरू फोल राहे जगी ।।
दाखविती भोळ्या जना चमत्कार । आम्ही फसणार नाही त्याने ।।
तुकड्यादास म्हणे तोचि संत जाण । ज्याने आत्मज्ञान प्राप्त केले।।

भुते कै काढती स्मशानी जागती । यंत्रे चालविती तंत्रासही ।।
ऐसे गुरू किती भेटले फुकट । तरी आम्हा वीट वाटे त्यांचा ।।
गारुड्याने जरी जादू दाखविली । ते 'गुरुमाऊली' म्हणो कैसी?।।
तुकड्यादास म्हणे गुरू तो वेगळा । जाणतसे कळा आत्मरूपी।।

**– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**



# जैन धर्माची पुरातनता आणि आजचे वास्तव!

**संजय सोनवणी, पुणे**
**७७२१८ ७०७६४**

जैन धर्माचे संस्थापक महावीर (इ.स.पूर्व ५९९ ते इ.स. पूर्व ५२७) आहेत असा सर्वसाधारण समज आहे. प्रत्यक्षात जैन धर्म अतिप्राचीन असून आद्य तीर्थंकर ऋषभनाथ हे इ.स. पूर्व २७०० मध्ये होऊन गेल्याचे आता ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत. या धर्माचा उदय सर्व जीवांना समान मानणाऱ्या श्रमण संस्कृतीच्या उदयकाळीच झाला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी याबाबत सविस्तर विवेचन आपल्या 'इंडियन फिलोसोफी' या ग्रंथात केले आहे व ते उद्बोधक असे आहे. इसवी सनापूर्वीच ऋषभनाथांची आराधना केली जात होती असे पुरावे मिळाले आहेत. यजुर्वेदामध्ये ऋषभ, अजितनाथ आणि अरिष्टनेमी ही तीन तीर्थकरांची नावे नमूद आहेत. महावीर हे जैन धर्माचे संस्थापक नसून ते त्यांच्यापूर्वी (इसपू ७७६) झालेल्या पार्श्वनाथांच्या परंपरेतील थोर सुधारक होते. ऋषभनाथांचे ऐतिहासिकत्व बघता जैन धर्म हा पार्श्वनाथापूर्वीही अस्तित्वात होता यात संशय राहत नाही.



डॉ. हर्मन ज्याकोबी म्हणतात की, जैन धर्म अगदी प्रारंभिक काळापर्यंत मागे जातो. त्यातील आदिम धार्मिक आणि आधिभौतिक सिद्धांत हे भारतीय तत्वज्ञानाच्या अगदी सुरुवातीच्या काळातील असल्याचे दिसतात. आस्त्रव आणि संवर हे शब्द हे जैनांनीच अत्यंत वेगळ्या परिप्रेक्षात मूळ अर्थाशी प्रामाणिक राहत वापरले आहेत. या आणि अशा शब्दांच्या वापरावरून जैन धर्म हा वेदपूर्व आणि खूप जुना आहे असे म्हणता येते. जैन धर्माचे संन्यासी बंधमुक्त, कर्मग्रंथीमुक्त जीवन जगतात म्हणून त्या धर्माचे नाव आधी निर्ग्रंथ असे होते. स्वत:वर विजय मिळवतात तेच जिन आणि जिनांचा समुदाय म्हणून पुढे जैन असे धर्माचे नाव स्थापित झाले. धर्मानंद कोसंबी म्हणतात कि निर्ग्रंथ म्हणजे बंधमुक्त. ही निर्ग्रंथांची परंपरा निश्चितपणे बुद्धपूर्व आहे. त्रिपिटकाच्या पालि भाषेत अनेक ठिकाणी जैनांना निगंठ म्हटले असून वप्प, उपाली, सच्चक अशा निगंठांच्या श्रावकांचा उल्लेख आढळतो.

तीर्थंकर या शब्दाने प्रेषित किंवा धर्मसंस्थापक असा अर्थ अभिप्रेत नाही. द्रष्टे, केवलज्ञानी आणि मानवाला अधिक उन्नत दिशा दाखवणाऱ्या व्यक्तीलाच तीर्थंकर असे संबोधले जाते. तीर्थंकर म्हणजे धर्माध्यक्ष, जैन संघप्रमुख, मोक्षमार्ग दाखविणारा असे या संज्ञेचे अर्थ होतात. पण हे झाले लौकिकार्थ. अध्यात्मिक अर्थाने मात्र तीर्थंकरालाच 'जिन' म्हणजे इंद्रिये जिंकणारा, अर्हत् अथवा अरिहंत (षड्रिपूंना ज्याने पराजित केले आहे), सर्वज्ञ, वीतरागी, केवली म्हणजे केवलज्ञानी अशी नावे दिलेली आहेत. तीर्थंकर हे केवली असतातच परंतु सर्व केवली तीर्थंकर होत नाहीत.

आद्य तीर्थंकरांपासून झालेल्या प्रत्येक तीर्थकराने जैन तत्वज्ञानात भर घातलेली आहे. पार्श्वनाथांनी 'चातुर्यामसंवर' म्हणजे अहिंसा, सत्य, अचौर्य व अपरिग्रह ही चार व्रते प्रतिपादन करणारा 'चातुर्याम धर्म' शिकविला; ज्यास 'स्थविरकल्प' म्हटले गेले. महावीरांनीही याच संप्रदायाची दीक्षा घेतली. त्यांनी त्यांत ब्रह्मचर्यव्रताची भर घालून आपली पाच महाव्रते किंवा 'पंचयामिक धर्म' सांगितला. यांशिवाय प्रतिक्रमण म्हणजे स्वपापांची कबुली व प्रायश्चित्त घेणे, नग्नव्रत, संन्यास व तप या गोष्टींचा अंतर्भाव केल्यावर ज्यास 'जिनकल्प' म्हटले गेले. पार्श्वनाथांचा प्राचीन 'स्थविरकल्प' आणि महावीरांचा सुधारित 'जिनकल्प' असे दोन्ही संप्रदाय काही काळ निराळे होते. परंतु महावीरांनी त्यांना नंतर एकत्र करून जैन धर्माला प्रभावी धर्म बनवण्यात मोठा वाटा उचलला

असल्याने जगातील प्रमुख धर्मसंस्थापकांत त्यांचे नाव आदराने घेतले जाते.

जैन अथवा बौद्ध धर्म हे वैदिक धर्म व कर्मकांडाविरुद्ध प्रतिक्रियांच्या स्वरूपात जन्माला आले असा सर्वसाधारण समज आहे; पण त्यात वास्तव नाही. मुळात वैदिक धर्म भारतात इ.सन पूर्व १२०० नंतर आला. भारतीय ऐहिक, वैचारिक व तत्त्वज्ञान संस्कृती वैदिकांच्या फार पूर्वी वैभवाच्या शिखरावर पोचलेली होती. या श्रमण संस्कृतीच्या विचारधारांनी वेगवेगळ्या तत्त्वज्ञानाच्या, संप्रदायांच्या आणि जीवनहेतूंच्या माध्यमातून आलेल्या लोकधर्मानेच लोकांचे वैचारिक व आध्यात्मिक प्रबोधन करण्याचे विस्तृत कार्य केलेले होते. असे असूनही वेद हेच श्रमण परंपरेचे स्त्रोत होत, असा काही वैदिक विद्वानांचा आग्रह असतो. उदा. आपल्या वैदिक संस्कृतीचा इतिहास या ग्रंथात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पृष्ठ क्र. ३५३ वर एकीकडे म्हणतात कि, बौद्ध व जैन धर्म म्हणजे वैदिक परंपरेच्या विरुद्ध बंड करून निघालेली हिंदूंचीच पाखंडे होत. एकीकडे बौद्ध आणि जैनांना पाखंड म्हणणारे तर्कतीर्थ जोशी दुसरीकडे लगेच म्हणतात कि बौद्ध व जैन धर्माचा वैदिक धर्माशी असलेला ऐतिहासिक संबंध अगदी निकटचा आहे. (पृ. ३५८)

पण प्रसिद्ध अभ्यासक जोहान्स ब्राँकहोर्स्ट म्हणतात कि, जैन व बौद्ध धर्म हे वैदिक धर्माच्याच शाखा आहेत अशी मान्यता असली तरी ती खरी नाही. हे दोन्ही धर्म वैदिक धर्माच्या प्रभावक्षेत्रापासून दूर असलेल्या भागात जन्माला आले. वैदिक तत्त्वज्ञानाचा आधार आणि जैन-बौद्धांच्या तत्त्वज्ञानाचे आधारही परस्परविरोधी आहेत. (Brahmanism: Its Place In ncient Indian Society, By Johannes Bronkhorst, p. 362,) मुळात जैन आणि बौद्ध धर्माला श्रमण संस्कृतीची अतिदीर्घ परंपरा आहे. जैन आणि बौद्ध यांच्या प्रमाणेच भारतात श्रमण संस्कृतीतील अनेक धर्मपंथ अस्तित्वात होते. त्यापैकी तत्कालीन इतर पाच प्रमुख आचार्यांचा उल्लेख बौद्ध त्रिपिटकात आहे. किंबहुना संन्यास, योग, अहिंसा, नैष्ठिक ब्रह्मचर्य इत्यादि बाबी तर श्रमण संस्कृतीचे स्वतंत्र उद्गार आहेत. महावीर याच परंपरेतील श्रेष्ठ समाजसुधारक होते व त्यांनी आपल्या तत्वज्ञानातून आणि संघटनेतून धर्मसुधारक म्हणून स्थान मिळवले.

कोणत्याही स्वरूपातील ईश्वराचे अस्तित्व नाकारून सर्वथैव कर्मालाच प्राधान्य देणारे धर्म भारतातच उदयास आले; आणि त्यापैकी जगाच्या पाठीवर जैन आणि बौद्ध हे दोन धर्म आज अस्तित्वात आहेत. ईश्वराशिवाय धर्म असू शकतो, ही गोष्ट आजच्या सामान्य माणसाला विचित्र वाटते. कारण 'धर्म म्हणजे ईश्वरप्रार्थना', हे समीकरण त्याच्या मनात ठसलेले असते. मराठीत आपण देवधर्म हा समास करून देव व धर्म यांचा संबंध प्रगट करतो. परंतु ईश्वर सृष्टिकर्ता आहे, तोच जीवांना त्यांच्या कर्मानुसार चांगली-वाईट फळे देतो, ही कल्पना जैन धर्माला मान्य नाही. सृष्टी ही कोणी केलेली नाही व कोणी तिचा नाशही करीत नाही. सृष्टीच्या-प्रकृतीच्या- अंगभूत नियमानुसार प्रत्येक जीवाला त्याच्या कर्मांचे फळ मिळत असते, असे जैन धर्माचे तत्त्वज्ञान आहे. जैन धर्म सृष्टिकर्ता ईश्वर मानीत नसला, तरी पापपुण्य, स्वर्गनरक व बंध-मोक्ष मानतो आणि मोक्षप्राप्तीसाठी इंद्रियनिग्रह व्रताचरण, ध्यानधारणा इ. गोष्टी आचरावयास आग्रहाने प्रतिपादन करतो.

सृष्टिकर्ता ईश्वर मान्य नसला, तरी कर्मग्रंथींचा नाश करून केवलज्ञानप्राप्ती व मोक्षप्राप्ती करून घेतलेल्या प्रत्येक जीवाला जैन ईश्वर म्हणतात. त्यांच्या गुणांची प्राप्ती होण्यासाठी, त्यांना आदर्श म्हणून पुढे ठेवून त्याच्या गुणांची भावना करणे, भक्ती करणेही जैन धर्माला मान्य आहे. त्यामुळे भारतवर्षामध्ये सगळीकडे तीर्थंकरांची भव्य मंदिरे प्राचीन काळापासून अस्तित्वात असून मोठ्या वैभवाने त्यांच्या मूर्तींची तेथे पूजा केली जाते. त्यामुळे प्रत्येक जीवास/मनुष्यास ईश्वर बनण्याचा अधिकार मान्य असलेला हा जगातील एकमेव धर्म आहे असे म्हणायला प्रत्यवाय नाही.

प्रत्येक धर्मात वैचारिक मतभेदांमुळे फूट पडल्याचे आपल्याला दिसते. जैनांचेही तेच झाले. जैनांची पहिली धर्मपरिषद पाटलीपुत्र येथे भगवान महावीरांच्या निर्वाणानंतर १६० वर्षांनी भरली होती. या परिषदेत भगवान महावीरांची वाणी संकलित केली गेली. त्यानंतर सम्राट चंद्रगुप्ताच्या काळात २१ वर्षांचा भयानक दुष्काळ पडला. या वेळी आचार्य भद्रबाहू हजारो जैन मुनींसह दक्षिणेत गेले. येथूनच श्वेतांबर आणि दिगंबर हे भेद निर्माण झाले असे मानले जाते. या दोन पंथात अनेक मान्यताभेद आहेत. दोन्ही पंथांत काही तात्त्विक व व्रताचरणाच्या मान्यता, धर्मग्रंथांचे प्रामाण्य यांत भेद आहेत.

पण कालौघात या दोन पंथांच्या अनुयायांना आपापल्या पंथांचीही मते बदलावी वाटली आणि त्यातून

पुढे अजून उपपंथ पडत गेले. दिगंबर पंथात वीसपंथी, तेरापंथी असे काही तर श्वेतांबरांत मंदिरमार्गी, स्थानकवासी असे काही उपपंथ निर्माण झाले आणि जैन तत्वज्ञानही कोठे विस्तारित तर कोठे संकुचित झाले. असे असले तरी उत्तर, मध्य व दक्षिण भारतात हा धर्म फार मोठ्या प्रमाणावर विस्तारला. अनेक राजांनी त्या धर्माला व्यक्तिगतरीत्या तर स्वीकारलेच पण राजाश्रयही दिला. महाराष्ट्रात हा धर्म केवढा प्रबळ होता याचे पुरावे इ.स.पूर्वीच्या तिसऱ्या शतकातील लोहगड व पाले येथील शिलालेख, देवगिरी किल्ल्यावरील जैन गुंफा, जिंतूर (जिनपूर), कोल्हापूर-सांगली इत्यादी भागातील शिलालेख व जैन गुंफा यावरून दिसते. राष्ट्रकूट काळात तर या धर्माने मराठी जीवनही व्यापले होते.

आठव्या शतकापर्यंत हा धर्म आपले सर्वस्वी स्वतंत्र तत्त्वज्ञान व अस्तित्व राखण्यात यशस्वी झाला. वैदिक धर्मातील कल्पनांना जैनांनी थाराही दिला नाही. पण दक्षिणेत आचार्य जिनसेनांच्या काळात दक्षिणेत ब्राह्मणी (वैदिक) धर्म आणि जैन धर्मात भीषण संघर्ष सुरु होता. महावीरांच्या उदारतम संस्कृतीला अनुसरून त्यांनी बऱ्याचशा ब्राह्मणी कर्मकांडांचे जैनीकरण केले. ते पुढे म्हणतात कि कोणीही साहित्यकार आपल्या काळातील सामाजिक प्रभावांपासून अलिप्त राहू शकत नाही; ही कृतीही त्याला अपवाद नाही. मनुस्मृतीत ज्याप्रमाणे गर्भादानापासून अंतिम संस्कारापर्यंत जी जी कर्मकांडे येतात त्याचेच जैन संस्करण आदिपुराणात आलेले आहे. पण अर्थात यात बदलही असून अहिंसादि जैन व्रतांचा स्वीकार ज्याही व्यक्तीने केला त्यालाच ब्राह्मण मानले गेले. अशा व्रतसंस्कार झालेल्या व्यक्तीने यज्ञोपवीत धारण करणे अनिवार्य केले. आदिनाथांनी समाज व राज्यव्यवस्था स्थापन केली व तीनच वर्ण निर्माण केले. पण भरत चक्रवर्तीने ब्राह्मण या चौथ्या वर्णाची स्थापना केली. यात व्रतसंस्काराने कोणीही ब्राह्मण बनू शकतो असे म्हटले. जैन ब्राह्मणाने असी, मसि, कृषी, आणि वाणिज्याच्या सहाय्याने उपजीविका करावी. (पृ. ८, पृ. १०, Mahapuran di Purana, Bhagavat Jinasena-carya By Pandit Panna Lal Jain, भारतीय ज्ञानपीठ, काशी, १९४४) अर्थात या वर्णांचा अर्थ आणि त्यांच्या नियत कर्मांना त्यांनी व्रतबंधनात बांधले हे वेगळेपण महत्वाचे आहे. (आदिपुराण, पर्व ३८) असे असले तरी हे बदल करून का होईना वैदिक आश्रम व्यवस्थेचे केले गेलेले हे अनुसरणच आहे व त्याचा प्राचीन जैन ग्रंथांतील मतांशी मेळ बसत नाही हे स्पष्ट आहे.

एकंदरीत प्राप्त परिस्थितीत तडजोड करून अथवा आपला धर्म वरिष्ठ असून वैदिक धर्म दुय्यम आहे हे दर्शवण्यासाठी प्रतिक्रियास्वरूप ही वर्णने आलेली दिसतात. याचे महत्वाचे कारण म्हणजे समग्र जैन साहित्यात वर्णांचा व स्पृश्य-अस्पृश्यतेचा स्पष्ट उल्लेख प्रथम फक्त आचार्य जिनसेनकृत आदिपुराणातच मिळतो. परंतु या पुराणाचा आजच्या जैनांवर अद्भुत प्रभाव असून त्यामुळेच श्रेष्ठ-कनिष्ठतादि विषमता व ब्राह्मणी संस्कारांचे जैन धर्मात मुळात नसलेले स्थान त्यांच्यात आज रुजलेले दिसते.

जैन धर्मतत्वे पूर्णतया स्वतंत्र असतानाही आज जैनांचे वेगाने वैदिकीकरण होत आहे की काय याची शंका यावी असे वातावरण आहे. महावीरांनी व पार्श्वनाथ यांच्या परंपरेतील एके काळी सहिष्णू आणि उदार असणारा हा धर्म संकुचित वृत्तीचा व असहिष्णू बनत चालला आहे हे अनेक घटनांवरून दिसते. जातीय जाणिवांचा त्याग केलेला हा धर्म आज कोठेतरी जातीयही झाला आहे आणि यामुळे या धर्माचा विस्तार पूर्वी जेवढ्या मोठ्या प्रमाणात होता तो आज दिसत नाही. पूर्वी जैन धर्मात ज्ञानी साधूंची एक प्रदीर्घ आणि समृद्ध परंपरा होती. त्यांनी मराठीसह देशांतील अनेक जनभाषांना समृद्ध केले. त्या त्या भाषांना साहित्य-व्याकरणही दिले. आज ती परंपरा क्षीण झालेली आहे. त्यामुळे आपल्या प्राचीन साहित्यात काय म्हटलेले आहे हे खुद्द जैनांनाच माहितही नाही. परिणामी जैनांकडे पाहण्याची जैनेतरांची दृष्टी एक संकुचित प्रवृत्तीचा अनुदार धर्म अशी होत गेलेली आहे आणि हे जनमतातील प्रतिबिंब या अतिप्राचीन धर्माला शोभणारी बाब आहे असे म्हणता येणार नाही. वैदिकीकारणाचा मोह व अंधानुकरण हेच या वाढत्या अनुदार प्रवृत्तीमागे आहे हे आजच्या जैन बांधवांना लक्षात घ्यावे लागेल. सर्व जीवांना ईश्वर होता येण्याची क्षमता आहे यावर श्रद्धा, असे महनीय तत्वज्ञान असलेला हा धर्म संकुचित प्रवृत्तीचा बनणार असेल तर तो विश्वधर्म कसा होईल यावर चिंतन करण्याची आवश्यकता आहे!

(लेखक इतिहास, संस्कृती, तत्त्वज्ञान आणि सामाजिकशास्त्रांचे संशोधक, अभ्यासक व स्तंभलेखक आहेत.)

●



# धिरेंद्र शास्त्रीचा दिव्य दरबार की चोर दरबार?

**नंदकिशोर तळाशीलकर, मुंबई**
**९८६९१७००६२**

धीरेंद्र शास्त्री याचा दिव्य दरबार दिनांक १८-१९ मार्च २०२३ रोजी एस. के. स्टोन ग्राउंड, मीरा भाईंदर रोड, मीरा रोड, ठाणे पूर्व येथे आयोजित करण्यात आला होता. बाबाला दिव्य ज्ञान आहे असे म्हणतात. पण त्याचा दरबार मुंबईत आहे की ठाण्यात आहे हे त्याला माहीत नव्हते. बाबाचे व्हिडिओ सोशल मीडियात प्रसिद्ध झाले होते. त्यात बाबाचा कार्यक्रम मुंबईत आहे असा बाबाने उल्लेख केला आहे. कार्यक्रमाला विरोध होण्याची शक्यता असल्यामुळे बॅनर, पोस्टर फक्त दोन दिवस आधीच लावण्यात आले होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला या कार्यक्रमाबाबत कळल्यानंतर बाबा अंधश्रद्धा पसरवणारे आणि चमत्काराचा दावा करणारे कार्यक्रम तसेच संत समाज सुधारकांचा अवमान करणारे वक्तव्य करतो म्हणून त्याला विरोध करण्याचा ठरवले. पोलीस प्रशासनाला तसे पत्र द्यायचे ठरले. कार्याध्यक्ष माधव बावगे व कार्यकारी समिती यांच्याबरोबर बोलणे झाले आणि यावर मध्यवर्ती कडून पत्र देणे अपेक्षित आहे हे ठरले.

दिनांक १७ मार्च रोजी कार्यक्रम मीरा रोड पोलीस स्टेशन अंतर्गत येत असल्यामुळे मीरा रोड पोलीस स्टेशनला निवेदन द्यायचे ठरवले. तसे निवेदन घेऊन नंदकिशोर तळाशिलकर, सचिन थिटे, मारुती पालशेतकर, सुमित वडगावकर हे मीरा रोड पोलीस स्टेशनला पोहोचले. मीरा रोड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह बागल यांची भेट घेतली आणि त्यांना सांगितले की धीरेंद्र शास्त्री हे समाजात चमत्काराच्या नावाने अंधश्रद्धा पसरवण्याचे काम करतात, संत समाजसुधारकांचा अवमान करतात. याआधी त्यांनी तसे गुन्हे केलेले आहेत, तसे व्हिडिओ सोशल मीडियावर पण उपलब्ध आहेत. त्यांच्यावर महाराष्ट्रात जादूटोणाविरोधी कायदा असल्यामुळे दक्षता अधिकारी म्हणून तुम्ही कारवाई केली पाहिजे असा आग्रह धरला. कार्यक्रमाचे पूर्ण व्हिडिओ शूटिंग करा आणि बाबांनी जर चमत्काराचा दावा केला तर त्याच्यावर लगेच कारवाई करा. असा आग्रह धरला. आम्ही आमच्या पद्धतीने कारवाई करू असं त्यांनी आश्वासन दिले. पण त्याचबरोबर आम्ही बाबाच्या विरोधात काही करू नये म्हणून कलम १४९ अंतर्गत आमच्यावर नोटीस बजावली.

नोटीसमध्ये सुरुवातीलाच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून धिरेंद्र शास्त्री हे अंधश्रद्धा पसरवतात आणि समाजात संत, समाज सुधारकांचा अवमान करतात या बाबत तसेच बाबांचा मिरा रोड येथील कार्यक्रम रद्द करा याबाबत निवेदन प्राप्त झाल्याचा उल्लेख केलेला आहे. त्यानुसार खरे तर जादूटोणाविरोधी कायदा अस्तित्वात असल्यामुळे दक्षता अधिकारी म्हणून त्यांनी बाबांवर कारवाई करणे अपेक्षित होते. पण आम्ही आमच्या निवेदनात कुठेही धरणे किंवा आंदोलन करणार नाही हे स्पष्ट लिहिलेले असून सुद्धा आम्ही बाबाच्या विरोधात कुठलेही आंदोलन करू नये म्हणून कलम १४९ अंतर्गत त्यांनी नोटीस बजावली होती. नोटीस मध्ये मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तांचा आदेश होता. त्यामध्ये पाच किंवा पाचपेक्षा जास्त लोकांनी एकत्र येण्यास मनाई केली आहे असं स्पष्ट लिहिलेले होते. असे असेल तर मग या बाबांच्या कार्यक्रमाला परवानगी कशी दिली? म्हणून, या नोटीसवर हरकत घेवून ती रद्द करण्यासाठी अ‍ॅड. तृप्ती पाटील यांनी नोटीसला उत्तर तयार केले. पण आयुक्त कार्यालयाला रविवारी सुट्टी असल्याने कर्मचारी व आयुक्त उपस्थित नव्हते. त्यामुळे निवेदन देता आले नाही. म्हणून नोटीस व हरकत माननीय मुख्यमंत्री गृहमंत्री व आयुक्त यांना ट्विट करण्यात आले.

दरम्यान धीरेंद्र शास्त्री यांच्या कार्यक्रमाला परवानगी मिळू नये म्हणून अ‍ॅड. नितीन सातपुते यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली होती. हायकोर्टात अर्जंट बेंच समोर ती सुनावणी झाली. याचिका फेटाळण्यात आली. पण

**(पृष्ठ क्रमांक १७ वर )**

# विज्ञान म्हणजे काय?



**सुधीर फाकटकर, नारायणगाव**
**९७६६७८३४६७**

विज्ञान हा शब्द आधुनिक कालखंडाशी नाते सांगणारा असला, तरी प्रत्यक्षात मुळीच तसे नाही. विज्ञान म्हणजे काय? तर या विश्व अथवा चराचर निसर्गसृष्टीतील प्रत्येक घटना किंवा घडामोडींमागील कारण जाणून घेणे म्हणजे त्या घडामोडींचे तत्त्व, नियम तसेच परिणाम अभ्यासणे. या अभ्यासातूनच चिकित्सा प्रत्येक घटिताचा कार्यकारणभाव कळत जातो. हा कार्यकारणभाव कळल्यानंतर अभ्यासलेल्या नियमांवर मानवी आवाक्यात शक्य असेल, त्या घटितांसाठी साधने विकसित होतात. अनेक साधनांच्या संयुक्त रचनेतून उपकरण आकाराला येते. काही उपकरणांची मिळून खास प्रणाली तयार होते. यालाच आपण विज्ञानातून जन्माला आलेला तंत्रज्ञानाचा आविष्कार म्हणतो. मग विज्ञान कधी जन्माला आले? या प्रश्नाचे उत्तर, जेव्हा विश्व निर्माण झाले त्यावेळेपासून असे आहे. कारण ज्यावेळी विश्व निर्माण झाले, तेव्हापासून भौतिक तसेच रासायनिक प्रक्रिया अर्थात घटना घडण्यास सुरुवात झाली.

माणसाने आजपर्यंत मिळवलेल्या ज्ञानानुसार साधारण १४०० कोटी वर्षांपूर्वी विश्व निर्माण झाले असे मानले जाते, तर सुमारे ४५० कोटी वर्षांपूर्वी पृथ्वी आकाराला आली. अर्थात, जी पृथ्वी आज दिसत आहे तशी पृथ्वी आकाराला आली नव्हती, तर तो उष्ण गोळा होता. ज्याचे तापमान चढउतार होत कमी होत चालले होते. पुढे ३८० कोटी वर्षांनी पृथ्वीच्या पृष्ठभागावर समुद्र आकाराला आले. दरम्यान, प्रचंड लांबलेल्या कोट्यावधी वर्षांमध्ये प्रकाशसंश्लेषण क्रिया होऊन तसेच पेशीनिर्मिती होत राहिली, तर समुद्रात पहिला जीव निर्माण होण्याची प्रक्रिया ऐंशी कोटी वर्षांपासून सुरू झाली. पुढे अखंड भूखंडातून आजच्या खंडांची निर्मितीप्रक्रिया तीस ते वीस कोटी वर्षांपूर्वी सुरू होती असे मानले जाते. या समुद्रात आणि भूखंडांवर असंख्य प्रकारचे प्राणी जन्माला आले. तसेच नष्टही झाले. यामध्ये आदिमानव आणि चिंपाझींचे पूर्वज साठ लाख वर्षांपूर्वी निर्माण झाले. या पूर्वजांमधून आदिमानव निर्माण झाला. तो पंचवीस लाख वर्षांपूर्वी त्यांच्याही काही जाती होत्या. त्या आदिमानवातून सुधारलेला किंवा विचारी मानव म्हणजे आपला आजच्या अवस्थेचा पूर्वज तीन लाख वर्षांपूर्वी उदयास आला. ज्याचं ठिकाण होतं आताच्या दक्षिण आफ्रिकेची भूमी. या सेपियनला सुमारे सव्वालाख वर्षांपूर्वी अग्नी निर्माण करण्याचे तसेच नियंत्रणात ठेवण्याचे ज्ञान अवगत झाले होते. हा कालखंड अश्मयुग होता. अश्मयुग म्हणजे मानव दगडी हत्यारे निर्माण करून वापरू लागला होता. दगडांबरोबरच लाकूड तसेच मातीचाही वापर याने केला होता. तिथून हा 'सेपियन' नामक आपलं मूळ घराणं जगभर पसरत राहिलं. दरम्यान, अन्य आदिमानव जाती नष्ट झाल्या.

अश्मयुगाच्या शेवटच्या कालखंडात म्हणजे साधारण इसवी सन पूर्व दहा ते बारा हजार वर्षांपूर्वी मानव शेती करू लागला होता. तसेच त्याने काही प्राणी माणसाळवले होते. हे ताम्रयुग तसेच त्यापुढील कास्ययुग होते. दरम्यान, चाक शोधण्यात आले होते. इसवीसनपूर्व पाच हजार वर्षांपूर्वी राज्ये निर्माण होण्यास आरंभ झाला. भाषालिपीचाही विकास याच काळात सुरू झाला. सागरांमध्ये प्रवास करण्याची प्राथमिक साधने निर्माण झाली. 'मानवी संस्कृती' नामक संकल्पनेची ही सुरुवात होत गेली. ही इसवी सन सुरू झाले तेव्हा लोहयुग अवतरले होते. पुढचा इतिहास आपण जाणतोच, तर सांगायचे म्हणजे पृथ्वीच्या वाटचालीत किंवा इतिहासात माणूस अगदी अलीकडचा आहे.

आता वळूया, माणूस आणि विज्ञान यांच्यातील संबंधांकडे. जगण्यासाठी अन्न खाणे ही कुठल्याही सजीवासाठी उपजत क्रिया आहे. मात्र संरक्षणासाठी आडोशाला किंवा सुरक्षित ठिकाणी राहाणे तसेच अंगाभोवती काहीतरी गुंडाळणे; या क्रियांपासून माणसाचा विज्ञानाशी संबंध आला. पुढे कधीतरी वणव्यात भाजला गेलेला प्राणी किंवा वनस्पती अधिक

चांगल्या चवीचा लागला असेल आणि अग्नीचा विचार सुरू झाला. मग अग्नीचे ज्ञान झाल्यानंतर अग्नी तयार करण्याचे तंत्र माणूस शिकला. ही महत्त्वाची पायरी होती. शेती करण्यास प्रारंभ झाल्यानंतर माणूस भटकायचा थांबला आणि स्थिरावू लागला. यातून मानवी संस्कृती निर्माण होण्यास चालना मिळाली.

मानवी समाज आकाराला येताना निसर्ग निरीक्षणांची सुरुवात अधिक चिकित्सेने होत जाऊ लागली. यात सर्वप्रथम जाणून घेतले गेले प्रकाश आणि उष्णता देणाऱ्या आकाशातील अग्नी गोलाबद्दल. मग अनुक्रमे रात्रीच्या अंधारात शीतल प्रकाश देणाऱ्या पांढऱ्या प्रकाशमान गोळ्याबद्दल. या गोळ्याचा आकार कमी-जास्त होताना लक्षात आले असेल. यापाठोपाठ रात्रीच्या अंधारात दिसणाऱ्या अन्य लहान पण ठसठशीत प्रकाशमान टिपक्यांचे ज्ञान झाले. या आकाशातल्या घटकांची नियमितता लक्षात आल्यानंतर ऊन, पाऊस आणि हिवाळा या ऋतूमानांचीही नियमितता कळली. या नियमित घटनांचा आणि वनस्पतींचा संबंध शोधून काढण्यात आला. हेच विज्ञान आणि त्या अनुषंगाने निर्माण झालेले तंत्रज्ञान होते.

विज्ञान जाणून घेताना आणि त्यातून तंत्रज्ञानाचा आविष्कार जन्माला घालताना गणित निर्माण झाले. आरंभी केवळ घटकवस्तू मोजण्यासाठी निर्माण झाले. गणित पुढे-पुढे वजन, अंतर, द्रव तसेच कालमापन करण्यासाठी विकसित होत गेले. या मोजमापनासाठी दैनंदिन जीवनातील किंवा सभोवतालचे संदर्भ विचारात घेत एकके निर्माण होत गेली. गणितातूनच आकाराला आलेल्या भूमितीला सैद्धांतिक बैठक मिळाली ती इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकात.

दरम्यान, चाकांचा जो थोडाफार विकास झाला होता त्याला प्राण्यांच्या शक्तीची जोड वाहने किंवा विहिरींमधून पाणी उपसणारी प्रणाली निर्माण झाली. बरोबरीने दिवसा सूर्याच्या आणि रात्रीच्या अंधारात चंद्र ग्रहगोळे तसेच ताऱ्यांच्या निरीक्षणांवरून खगोलशास्त्र निर्माण झाले. माणूस आदिमानव कालखंडापासून केवळ उघड्या डोळ्यांनी आकाशातील घटकांचे निरीक्षण करत होता. पुढे त्याला कोनमापकादी साधनांची जोड मिळाली. हा प्रवास इसवी सनानंतर सहस्त्रकापेक्षाही जास्त काळ सुरळीत राहिला. मात्र सोळाव्या शतकात ज्यावेळी काचेतून निर्माण झालेल्या भिंगस्वरूपातील दुर्बिणद्वारे जेव्हा आकाशातील घटक पाहिले, तेव्हा खगोलशास्त्राचे दुसरे पर्व सुरू झाले. दुसरीकडे सूक्ष्मदर्शकाचाही विकास झाला. मानवी डोळ्यांच्या पलीकडे पाहाणे जे शक्य नव्हते ते आता आवाक्यात आले. दूरवरचे किंवा व्याप्त आणि सूक्ष्म पाहाण्यासाठी मानवी डोळ्यांना शक्तिशाली म्हणता येईल, अशी जोड मिळाली. हाच आधुनिक विज्ञानयुगाचा आरंभ मानला जातो.

पुढच्या शतकात वाफेचे इंजिन शोधले गेले. हा देखील वाफेच्या शक्तीचे विज्ञान जाणून घेतल्यानंतर जन्माला आलेल्या तंत्रज्ञानाचा आविष्कार होता. वाफेच्या इंजिनामुळे चाकांना अधिक बळ मिळाले. या बळातूनच यंत्रप्रणाली विकसित होऊ लागल्या. अठराव्या शतकात विद्युतशक्ती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नांना यश मिळण्यास एक शतक गेले. एकोणिसाव्या शतकात विद्युतशक्ती नियंत्रणात येत असताना मूलद्रव्यांचे विज्ञान जाणून घेतले जात होते. तसेच रासायनिक प्रक्रिया समजावून घेतल्या जात होत्या. विद्युत संकेतांच्या माध्यमातून संदेशवहनही याच शतकात साध्य झाले होते. बरोबरीने पदार्थाचे मूलकण शोधण्यास प्रारंभ झाला होता. एकोणिसावे शतक संपत येताना संदेशवहनाबाबत नावीन्यपूर्ण शोध लागण्याची चिन्हे दिसू लागली होती. तसे घडलेच. विसाव्या शतकाच्या आरंभी विद्युत तारांशिवाय संदेशवहन साध्य झाले आणि मानवी ध्वनी एका खंडातून दुसऱ्या खंडात ऐकता येणे शक्य करण्यात आले.

हेच विसावे शतक मध्यापर्यंत दोन महायुद्धांनीही गाजले. माणसाने आजपर्यंत जाणून घेतलेल्या विज्ञानाचा आणि त्यातून विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा तिटकारा यावा असे वाटले. कारण या दोन्ही महायुद्धांमध्ये विकसित केलेल्या तंत्रविज्ञानातून संहारक शस्त्रे निर्माण झाली आणि त्यामुळे मनुष्यहानी घडली. अर्थात, ही संहारक शस्त्रे वापरणारा माणूसच होता. विशेषतः दुसऱ्या महायुद्धादरम्यान वापरण्यात आलेला अणुबॉम्ब मानवजातीसाठी काळीमा ठरला. खरे तर, वैज्ञानिकांनी प्रयासाने शोधलेली अणुऊर्जा शांततामय उपयोगांसाठी वापरण्यात येऊ शकली असती. पण या तंत्रविज्ञानाचा उपयोग विवेकबुद्धीने झाला नाही. ही माणसाचीच चूक होती. ही चूक अर्थातच कळली आणि सर्व जगाने

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शांततामय मार्गाने वाटचाल करण्याचे ठरवले.

विसाव्या शतकाच्या मध्यानंतर मात्र महायुद्धात विकसित झालेल्या अग्निबाण तंत्रप्रणालीचा उपयोग अवकाश संशोधन करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला. याला जोड मिळाली ती आधुनिक संदेशवहनप्रणालीची. आरंभी दूरदर्शन आणि पुढे संगणक अशा काही अत्याधुनिक तंत्रप्रणालीमुळे माणसाने चंद्रभूमीवर पाऊल ठेवले. चंद्रावर जाऊन माणूस पुन्हा सुरक्षितपणे पृथ्वीवर परतला. माणसाच्या आदिमानव कालखंडापासून झालेल्या वाटचालीतील हा प्रचंड मोठा टप्पा ठरला. सर्व प्राणीमात्रांमध्ये दुबळा असलेल्या माणसाने हा महापराक्रम साध्य केला होता. चांद्रभूमीवरील आरोहण या घटनेच्या आधी आणि नंतर अशीच कालखंडाची विभागणी झाली. या अद्वितीय घटनेने पुन्हा एकदा विज्ञान आणि तंत्रज्ञानावर विश्वास ठेवण्यास भाग पाडले.

एकविसावे शतक उजाडले तेव्हा आंतरजालीय प्रणालीमुळे (इंटरनेट) सगळं जग एकत्र आलं होतं. आज दैनंदिन व्यवहारातील इंटरनेटचा वापर पडताळून पाहिला, तर याची प्रचिती येईल. दळणवळण, आरोग्य, औषधोपचार, शेती अशा अनेक विषय क्षेत्रांतील प्रगती अभ्यासली तर विज्ञान आणि त्या अनुषंगाने विकसित होत गेलेल्या तंत्रज्ञानाचा आवाका सहज लक्षात येईल. विज्ञान-तंत्रज्ञानाचा स्पर्श न झालेल्या वस्तू किंवा घटकांची यादी तयार घेतल्यानंतर याचा प्रत्यय यावा. दुसऱ्या बाजूला याच तंत्रज्ञानाच्या अविवेकी आणि गैरवापरामुळे झालेले नुकसानही दिसून येईल. यावर पर्याय म्हणून विज्ञान किंवा तंत्रज्ञान कधीच टाळता येणार नाही. मानवतेच्या हिताच्या दृष्टिकोनातून आणि विवेकी विचाराने जर विज्ञान आणि तंत्रज्ञान अंगीकारले, तर माणसाची यशस्वी वाटचाल निरंतर पुढे चालू राहील.

(लेखक मीटर तरंगलांबीची रेडिओ महाकाय दुर्बिण वेधशाळेत इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असून विज्ञानप्रसाराच्या कार्यात सक्रिय आहेत.)

●

---

**(पृष्ठ क्रमांक १४ वरून )**

कोर्टाने धीरेंद्र शास्त्री यांच्या कार्यक्रमावर बंधने आणून कार्यक्रम करायला परवानगी दिली. संपूर्ण कार्यक्रमाचा व्हिडिओ शूटिंग करण्याचे पोलिसांना आदेश दिले. त्याचप्रमाणे अंधश्रद्धा किंवा चमत्काराचा दावा किंवा संत समाज सुधारकांचा अवमान करणारे कुठलेही वक्तव्य त्यांनी केले तर लगेच कायदेशीर कारवाई करायला पोलिसांना आदेश दिले. तसेच असं काही कृत्य घडलं तर पुन्हा याचिका दाखल करण्याची परवानगी कोर्टाने दिली.

महा.अंनिसच्या जनजागृतीमुळे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, संभाजी ब्रिगेड, वारकरी संप्रदाय आणि इतर लोकांनीही धिरेंद्र शास्त्री यांच्या मीरा रोड येथील कार्यक्रमाला विरोध केला आणि तशी निवेदने, तक्रारी मीरा रोड पोलीस स्टेशनला दिल्या होत्या. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विरोधामुळे धीरेंद्र महाराजांनी भव्य दरबारात कुठलाही चमत्कार केला नाही. तसेच अंधश्रद्धा पसरवणारे वक्तव्य केलं नाही. उलट, मी चमत्कार करत नाही असा दावा केला. हे महा.अंनिसने केलेल्या जनजागृती, समाज जागृतीचे यश आहे.

प्रत्यक्ष शनिवारी दिव्य दरबार भरवला गेला. त्या ठिकाणी महिलांची मंगळसूत्रे, दागिने, सोन्याचे चैन यांची चोरी झाली. मिळालेल्या माहितीनुसार ३६ महिलांचे लाखोंचे दागिने चोरीला गेले. हा आकडा पन्नास लाखाच्या आसपास जाऊ शकतो तसेच काही महिलांनी तक्रारी न केल्याने प्रत्यक्षात आकडा अजून वाढू शकतो. पोलिसांकडून अधिकृत तक्रारीचा आकडा व अधिकृत रक्कम जाहीर करण्यात आलेली नाही. त्यांच्या तक्रारी मीरा रोड पोलीस स्टेशनला दाखल झाल्या आहेत. प्रश्न असा येतो जर धीरेंद्र शास्त्रीना दिव्यशक्ती प्राप्त आहे आणि ते समोरच्या माणसाचे नाव ओळखतात. मग ते चोराला का ओळखू शकले नाहीत? चोराचे खानदान त्यांनी चिठ्ठी, परची मधून काढून भक्तांना का दाखवलं नाही? त्याचे पडसाद सोशल मीडियावर पण उमटले आणि सोशल मीडियाने याबाबत धिरेंद्र शास्त्री यांना जबाबदार धरून भक्तांचे गेलेले दागिने परत करा, चोरांची नावे सांगा, चोरांची चिठ्ठी काढा असे व्हिडिओ व्हायरल झालेत. म्हणजेच, एकूणच दिव्य दरबार होता की चोरांना मदत करणारा चोर दरबार होता अशी चर्चा चालू आहे.

(लेखक महा.अंनिसचे राज्य प्रधानसचिव आहेत.)

●




# धूमकेतू

**शंकर शेलार, सांगली**
**९६५७८८७५३२**

ग्रीन कॉमेट धूमकेतू हा तब्बल पन्नास हजार वर्षांनंतर २ फेब्रुवारी २०२३ रोजी पृथ्वीच्या सर्वात जवळ म्हणजे ४.२ कोटी किलोमीटरवर, आला होता. तो त्यावेळी इतका तेजस्वी होईल की, पृथ्वीच्या उत्तर गोलार्धातून उघड्या डोळ्यांनी पाहता येईल, असा अंदाज शास्त्रज्ञांनी वर्तविला होता. परंतु तो तितका तेजस्वी झाला नाही; मात्र दुर्बिणीतून पाहता आला. त्यानंतर तो दूर जात १० ते १२ फेब्रुवारी दरम्यान मंगळापर्यंत पोहोचला.

**धूमकेतूंचा इतिहास:**


पुरातन काळात आकाशामध्ये अचानक घडणाऱ्या, दैवी चमत्कार वाटाव्या अशा अद्भुत खगोलीय घटनांच्या स्मृती त्या त्या काळातील लोकांनी वेगवेगळ्या पद्धतीने जतन करून ठेवलेल्या आजही सापडतात. अशा अनेक नोंदींपैकी, काही नोंदी गुहांमध्ये मोठमोठ्या पाषाणांवरती चित्ररूपाने रेखाटलेल्या, तर काही ठिकाणी शिल्परूपाने कोरलेल्या आढळतात. अलिकडच्या काळात चित्रलिपी विकसित झाल्यावर पेंटिंगच्या स्वरूपात (beyo tapestries) या नोंदी जतन केलेल्या पाहायला मिळतात. या पुरातन नोंदी आज खगोल वैज्ञानिकांना खूपच उपयोगी ठरत आहेत. आकाशामध्ये क्वचित पाहुण्यासारखे येणारे, शेपूट असलेले तारे (पुच्छल तारे) ज्यांना आज आपण धूमकेतू म्हणून ओळखतो त्या सूर्यमालेतील पाहुण्या शेंडे नक्षत्रांचीसुद्धा आपल्या पूर्वसूरींनी नोंद घेतली होती, असे दिसते. १७ व्या शतकात एडमंड हॅले या खगोलवेत्त्याने अशाच जुन्या नोंदींचा अभ्यास करून धूमकेतूच्या कक्षांबद्दल बरेच संशोधन केले होते.




धूमकेतूंच्या आगमनाबद्दल प्राचीन काळच्या समाजामध्ये खूपच गैरसमज होते; अंधश्रद्धा होत्या. आजदेखील असे गैरसमज सर्वत्र आढळतात. धूमकेतूचे आगमन हा एक प्रकारचा अपशकुन मानला जायचा. धूमकेतू आला म्हणजे राज्यावर काहीतरी संकट येणार, राजा आजारी पडणार, राजाचा मृत्यू होणार, परचक्र येणार, भूकंप, अवर्षण, अतिवृष्टी असे दैवीप्रकोप होणार, जीवघेण्या आजारांच्या साथी येणार. असे अनेक गैरसमज जगभर रूढ होते. अशा अस्मानी संकटांमधून आपले आणि आपल्या प्रजेचे रक्षण व्हावे म्हणून राजेलोक, भीतीपोटी का होईना; पण त्याकाळी त्यांच्या दरबारामध्ये ज्योतिर्विदांची नेमणूक करीत. हे ज्योतिषी आकाशाचा अभ्यास करून, भविष्यात घडणाऱ्या खगोलीय घटनांचे भाकीत करीत आणि देशावरील संकट टळावे म्हणून राजाला यज्ञ-यागादी उपाय योजना सुचवीत असत. या असुरक्षिततेच्या भावनेतून, अशुभ घटनांच्या तावडीतून आपले रक्षण व्हावे म्हणून त्याकाळी आकाशाचा अभ्यास केला जायचा.


भारतात वैदिक वाङ्मयात अथर्ववेद, यजुर्वेदामध्ये धूमकेतूबद्दल उल्लेख सापडतात. पाचव्या शतकातील वराह मिहीरने त्याच्या 'बृहतसंहितेत' धूमकेतूची वर्णने लिहिली आहेत. तसेच इ. स. पू. ३५० साली ग्रीक तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटलने त्याच्या 'मिटिऑरॉलॉजिआ' या ग्रंथात, धूमकेतू हे पृथ्वीच्या वातावरणात दूरवर घडणारे निसर्गाचे निःश्वास आहेत, असे मत मांडले आहे. पुढे पहिल्या शतकात क्लाऊडीअस टॉलेमीने ॲरिस्टॉटलच्या मतास पाठिंबा दर्शविला होता. टॉलेमी हा एक नावाजलेला खगोलवेत्ता होता, ज्याने पृथ्वीकेंद्रित विश्वाचा सिद्धांत मांडला होता. हा सिद्धांत पंधराव्या शतकापर्यंत जगभर ग्राह्य धरला जात होता. याच काळात रोमन खगोलविद ल्युसिअस सिनेका याने मात्र 'धूमकेतूंचा

संबंध पृथ्वीशी नसून, ते अंतराळातील पिंड असल्याचे मत मांडले. मात्र तो ते सप्रमाण सिद्ध करू शकला नाही. पुढे १६व्या शतकातील हाडाचा निरीक्षक टायको ब्राहे याने स्वतः बनवलेल्या उपकरणांच्या साहाय्याने १५७७ साली आलेल्या धूमकेतूचे वेध घेऊन, असे सिद्ध केले की, धूमकेतू हे चंद्रापेक्षाही खूप दूरवरून येणारे खगोलीय पिंड आहेत. पुढे १६८२ साली आलेल्या धूमकेतूचे निरीक्षण करून आणि पुष्कळ जुन्या नोंदी अभ्यासून, एडमंड हॅले याने गणिताद्वारे सिद्ध केले की, धूमकेतूच्या कक्षा (सूर्याभोवती फिरण्याचा मार्ग) या ग्रहांच्या कक्षांप्रमाणे अंडाकृती (elliptical) नसून लंब वर्तुळाकार (parabolic) असतात. जुन्या नोंदी तपासताना त्याच्या हेही लक्षात आले की, पूर्वी १३७८, १४५६, १५३१, १६०७ साली दिसलेला धूमकेतूच पुन्हा १६८२ साली दिसत असला पाहिजे. ज्यार्थी त्याचा आवर्तन काळ (धूमकेतूच्या दोन सूर्य-भेटींमधील काळ) ७५-७६ वर्षांचा आहे, त्याअर्थी हा धूमकेतू पुढे १७५८च्या सुमारास पुन्हा दिसेल, असेही भाकीत त्याने वर्तविले. त्याचे हे भाकीत खरेही ठरले. धूमकेतू दिसला सुद्धा, पण तो पाहाण्यासाठी हॅले जिवंत नव्हता. इंग्लंडवासियांनी या धूमकेतूचे नामकरण 'हॅलेचा धूमकेतू' असे करून, हॅलेच्या संशोधन कार्याची स्मृती कायमस्वरूपी जतन केली.




**धूमकेतूंचे वास्तव**

खगोल वैज्ञानिकांनी धूमकेतूंबद्दल बरीच शास्त्रीय माहिती मिळवलेली आहे. नासा या अमेरिकन अंतराळ संशोधन संस्थेने एका धूमकेतूवर कृत्रिम कुपी पाठवून, धूमकेतूंचा सखोल अभ्यास केला आहे. जान ऊर्ट (Jan Oort) या डच खगोल शास्त्रज्ञाने १९५० साली असे सांगितले की, सूर्यमालेच्या बाह्य प्रदेशांमध्ये, सूर्यापासून सुमारे १० हजार ते ५० हजार ख. ए. एक खगोलीय एकक म्हणजे पृथ्वी आणि सूर्य यांच्यातील सरासरी अंतर, जे अंदाजे १५ कोटी किलोमीटर आहे.) अंतरावर एक विशाल गोलाकार मेघ आहे. ज्याच्यामध्ये अब्जावधी धूमकेतू तयार होऊन फिरत असतात. त्यांपैकी काही धूमकेतू सूर्याच्या गुरुत्वाकर्षण कक्षेत सापडून सूर्याकडे येतात आणि सूर्याला वळसा घालून निघून जातात. या धूमकेतूंना सामावणाऱ्या अतिथंड मेघास ऊर्टचा मेघ (Oort Cloud) असे संबोधतात.



धूमकेतू हे बर्फ, कार्बन डाय ऑक्साईड वायू आणि धुळीच्या गोठलेल्या मिश्रणाने (dirty ice ball) बनलेले असतात. त्यांच्यामध्ये मिथेन, अमोनिया, सिलिका यासारखे घटकदेखील आढळतात. गोठलेल्या बर्फ, धूळ आणि वायूचे हे गोल गोळे जेव्हा सूर्याच्याजवळ येतात, तेव्हा सूर्याची उष्णता आणि सौरवातामुळे त्यांना शेपूट फुटते आणि त्यांना आकर्षक आकारही प्राप्त होतात. त्यामुळे धूमकेतूचे न्युक्लिअस, कोमा व टेल असे तीन भाग तयार होतात. धूमकेतूच्या या विविध अंगांचे स्वरूप कसे असते ते आता पाहू!

**केंद्र भाग** (Nucleus) : याला धूमकेतूचा गाभा किंवा डोके म्हणता येईल. हा गाभा साधारण २०ते २५ किलोमीटर व्यासाचा असतो. याच्यातील द्रव्य गोठलेल्या अवस्थेत असते. हा भाग आकाराने अत्यंत छोटा असल्याने व तो कोमा या बाह्य भागाने वेढलेला असल्यामुळे उघड्या डोळ्यांनी दिसणे जरा कठीणच असते.

**कोमा** (coma) : धूमकेतूचे धड म्हणता येईल असा हा धूमकेतूचा दुसरा भाग, त्याच्या गाभ्याभोवती लाखो किलोमीटर पसरलेला असतो. या भागातील द्रव्य सूर्याच्या उष्णतेमुळे प्रसरण पावलेले असते. सूर्यप्रकाशामध्ये उजळून निघाल्यामुळे हा भाग आपल्याला दूरवरून देखील पाहायला मिळतो.

**शेपटी** (Tail) : धूमकेतू सूर्याच्याजवळ आल्यावर सौरवात आणि उष्णतेमुळे, त्याला दोन प्रकारच्या शेपट्या फुटलेल्या दिसतात. पैकी एक शेपटी जी धूमकेतूच्या गतीच्या विरुद्ध दिशेला वळलेली असते. ती धूमकेतूमधील धुलिकण व वायूंची (Dust tail) बनलेली असते, तर दुसरी शेपटी जी विद्युतभारित कणांमुळे बनलेली असते, ती सूर्याच्याविरुद्ध दिशेला कोट्यावधी किलोमीटर दूरपर्यंत पसरलेली असते. सौरवातामुळे धूमकेतूला ही लांबलचक शेपटी (Ion tail) प्राप्त झालेली असते. सूर्याच्या उष्णतेमुळे धूमकेतूमधील बर्फ वितळून ही शेपटी तयार होते. त्यामुळे धूमकेतूचा आकार एखाद्या कुंचल्यासारखा दिसतो. या शेपटीमुळेच धूमकेतू पटकन ओळखता येतो. धूमकेतूंचे आकार जरी छोटे असले तरी त्यांची घनता खूप असते. सूर्याजवळून जाताना हे धूमकेतू आपल्या शेपटीमधून भरपूर द्रव्य पाठीमागे सांडत जातात. जेव्हा आपली पृथ्वी सूर्याभोवती फिरताना या भागातून जाते, तेव्हा हा धूमकेतूचा कचरा गुरुत्वाकर्षणामुळे पृथ्वीकडे खेचला जातो. हा कचरा पृथ्वीच्या वातावरणात घुसतो आणि घर्षणाने पेटतो. अशावेळी पृथ्वीवासियांना उल्का वर्षावाचे सुंदर हस्य पाहायला मिळते. हॅलेच्या धूमकेतूचा गाभा केवळ १६ कि.मी. लांब आणि ७.५ कि.मी. रुंदीचा आहे. मात्र तो जसा सूर्याच्याजवळ येत जातो तसा त्याच्या शेपटीतून सेकंदाला २५ ते ३० टनांपर्यंत द्रव्य बाहेर पडत असते. याच कारणास्तव कालांतराने असे धूमकेतू नष्ट होतात. काही धूमकेतू ग्रह गोलांच्या गुरुत्वाकर्षण कक्षेत येऊन त्यांना धडकून लोप पावतात, तर काही सूर्यामध्ये कोसळून नष्ट होतात. शूमेकर–लेव्ही हा धूमकेतू १९९४ साली जुलै महिन्यात गुरू ग्रहावर आदळून नष्ट झाला आहे. काहींच्या कक्षा प्रदीर्घ लंबवर्तुळाकार असल्याने ते एकदा येऊन गेल्यावर पुन्हा सूर्याकडे येत नाहीत. धूमकेतूंच्या कक्षांवरून धूमकेतूंचे खालीलप्रमाणे वर्गीकरण केले जाते.

**धूमकेतूंचे वर्गीकरण**

**१) कमी आवर्तन काळ** (short period) **असलेले धूमकेतू :** या प्रकारातील धूमकेतूंच्या कक्षा कमी लांबीच्या असतात. गुरू ते प्लुटो या ग्रहांदरम्यान या धूमकेतूंच्या लंबवर्तुळाकार भ्रमण कक्षा असतात. यांचा आवर्तन काळ २०० वर्षांपेक्षा कमी असतो.

**२) दीर्घ वर्तुळाकार कक्षा** (long period) **असलेले धूमकेतू:** या धूमकेतूंच्या कक्षा दीर्घ वर्तुळाकार (parabolic) असल्यामुळे या धूमकेतूंचा आवर्तन काळ २०० ते १००० वर्षांपर्यंत असू शकतो.

**३) नियर हायपरबॉलिक ऑर्बिट कॉमेट :** ज्या धूमकेतूंच्या कक्षा खूपच मोठ्या आकाराच्या किंवा प्रदीर्घ लंब वर्तुळाकार असतात आणि ज्यांचा आवर्तन काळ १००० वर्षांपेक्षा जास्त असतो अशा धमकेतूंना नियर हायपरबॉलिक ऑर्बिट कॉमेट असे म्हणतात.

**४) हायपरबॉलिक ऑर्बिट कॉमेट :** या प्रकारातील धूमकेतूंच्या कक्षा प्रदीर्घ लंबवर्तुळाकार हायपरपॅराबोलिक असतात. त्यामुळे हे धूमकेतू एकदा येऊन गेल्यावर पुन्हा फिरून सूर्याकडे येत नसतात.

अशा प्रकारे धूमकेतूंच्या कक्षा व आवर्तन काळावरून त्यांचे चार प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते.

सूर्यमालेमध्ये नेहमीच एक–दोन धूमकेतू रेंगाळत असतात. पण त्यांचे दर्शन घडतेच असे नाही. जे धूमकेतू आकाराने बऱ्यापैकी मोठे असतात आणि पृथ्वीच्या जवळून जातात तेच प्रेक्षणीय ठरतात. अर्थातच त्यांची संख्याही कमीच असते. असे हे दूरवरच्या प्रदेशातून ग्रहमालेत येणारे आगंतुक पाहुणे, त्यांच्याबद्दल जनसामान्यांमध्ये कुतूहल असते. तसेच बरेच गैरसमज आणि भीतीसुद्धा असते. मात्र अशा गैरसमजांना खगोल विज्ञानामध्ये अजिबात स्थान नाही. उलटपक्षी काही खगोल शास्त्रज्ञांच्या मते, 'जेव्हा पृथ्वी आकाराला आली तेव्हा या दूरवरून येणाऱ्या बर्फ, वायू व धूळमिश्रित गोठलेल्या गोळ्यांनी पाणी आणि जीवसृष्टीची बीजे पृथ्वीतलावर आणून सोडली असावीत', असे मत प्रख्यात खगोलशास्त्रज्ञ फ्रेड हॉएल आणि चंद्रा विक्रमसिंघे यांनी एका सिद्धांतात मांडले आहे.

अशा प्रकारे आगंतुकपणे सूर्यमालेला भेट देऊन जाणारे हे दूरवरचे पाहुणे 'खगोलीय पिंड' आपला संबंध आंतर तारकीय प्रदेशाशी जोडतात. धूमकेतूंचा शास्त्रीय अभ्यास मानवाला दूरच्या प्रदेशाची माहिती तर पुरवेलच, त्याचबरोबर कदाचित जीवसृष्टीच्या निर्मितीचे कोडे उलगडण्यासाठी सुद्धा उपयोगी ठरेल.

(लेखक महा.अंनिसचे सांगली जिल्हा प्रधानसचिव आहेत)

# वक्तृत्वाचा पाया : मौखिक परंपरा



**डॉ. संजय थोरात, इस्लामपूर**
**९८५०२४८२८६**

मौखिक परंपरा हा आपल्या देशातील वक्तृत्वाचा भक्कम पाया आहे. आपल्या वक्तृत्वाच्या प्रेरणा प्रामुख्याने आध्यात्मिक व राजकीय स्वरूपाच्या आहेत. पाश्चात्त्य राष्ट्रांच्या तुलनेत आपल्या देशातील वक्तृत्वाला औपचारिक व शास्त्रीय पाया मर्यादित आहे. मात्र वक्तृत्वासाठी पोषक घटक व मूलद्रव्य आपल्या संस्कृतीत आहेत. भारतात राजेशाही व संस्थानिकांचे राज्य असल्यामुळे लोकशाही असलेल्या देशासारखी वक्तृत्वास अनुकूल स्थिती नव्हती. पाश्चात्त्याप्रमाणे वक्तृत्वावरचे ग्रंथ लिहिले गेले नाहीत. अथेन्स व होडसप्रमाणे वक्त्यांना प्रशिक्षण देणाऱ्या कार्यशाळा नव्हत्या. मुद्रणकलेचा अभाव होता. मात्र आपली मौखिक परंपरा व कृतिशील विचारवंतांचे कार्य वक्तृत्वाला पोषक वातावरण निर्मिती करीत आले. आपल्या संस्कृतीत सरस्वती ही वक्तृत्वगुणांची देवता मानतात. 'वाग्मी' व 'वागविद' हे वक्तृत्वाशी संबंधित शब्द रामायण काळापासून प्रचलित आहेत. वाग्मी म्हणजे वाबदुक अथवा वक्ता तर वागविद म्हणजे शाब्दिक दान करणारे. वेद व उपनिषद उपनिषदकारांनी वक्तृत्वाचा उल्लेख केला आहे. वेदांनी वाक किंवा शब्द शाश्वत आहेत, अशी भूमिका घेतली आहे.

वाल्मिकी रामायणात हनुमान हा उत्तम वक्ता आहे. रावणाचा भाऊ बिभीषण रामाला शरण येतो. बिभीषण रावणाच्या राजवटीला कंटाळला होता. सुग्रीव, अंगद, मिंडा या वानरसेनेतील सेनापतींनी बिभीषणाला अभय देण्याबद्दल शंका व्यक्त केल्या. मात्र हनुमानाने बिभीषणाला आश्रय देणे योग्य आहे, अशी भूमिका मांडली. हनुमानाच्या अमोघ वक्तृत्वामुळे राम व बिभीषण यांचा मैत्री करार झाला. रामाने राज्य स्वीकारावे म्हणून भरताना केलेला युक्तिवाद, रावणाने सीतेची मुक्तता करावी म्हणून अंगदाने केलेली शिष्टाई ही भारतीय संस्कृतीतील वक्तृत्वाची उदाहरणे आहेत. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला युद्धाच्या काळात गीता सांगितली. रणांगणावर जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगून पांडवांच्या सैन्याला जीवनाची लढाई लढण्यासाठी प्रेरित केले. श्रीकृष्णाचे बोलणे व त्याचे गीतेवरील भाष्य अजोड वक्तृत्वाचा नमुना म्हणून पाहिले जाते. आपल्या भारतीय संस्कृतीत राजदरबार व मंदिरे वक्तृत्वाचा प्रकाश देणारी मुख्य स्थाने होती.

धर्म व पंथाच्या संस्थापकांनी धर्माच्या प्रचारासाठी अनुयायी व प्रतिपक्षाबरोबर वाद-संवाद सुरू ठेवला. भगवान गौतम बुद्ध देशाबाहेर फारसे फिरले नाहीत. मात्र त्यांनी व त्यांच्या शिष्यांनी स्पर्धकांचा वाद-विवादात पराभव केला. चर्चेत पराभव पत्करलेल्या विद्वानांनी बौद्धधर्म देश व देशाबाहेर पोहोचवला. गौतम बुद्ध व त्यांच्या शिष्यांनी मानवी दुःखाचे कारण भौतिक गरजेत आहे. वैदिक तत्त्वज्ञान कुचकामी आहे, अशी भूमिका घेऊन सत्य, अहिंसा, प्रज्ञा, करुणा, समता या मानवतावादी तत्त्वांचा प्रचार 'पाली' या लोकभाषेत केला. गौतम बुद्ध व त्यांच्या अनुयायांची प्रश्नोत्तरांची पद्धत सॉक्रेटिससारखी आहे. जैन धर्मातील चोविसावे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या अनुयायांनी संवाद-कौशल्याच्या जोरावर धर्मप्रसार केला. गौतम बुद्धाप्रमाणेच महावीरांनी वैदिक परंपरेविरुद्ध बंड करताना 'अर्धमागधी' ही लोकभाषा स्वीकारली. बौद्ध, जैन व लिंगायत या पंथांनी वेदाविरुद्ध प्रचार केला. महानुभव पंथाचे संस्थापक चक्रधर हे बुद्धिवादी व समताप्रेमी होते. विषमतावाद्यांनी त्याच्या पंथाचा नायनाट करण्याचा प्रयत्न केला. जातिभेद, अस्पृश्यता व सामाजिक विषमतेला विरोध करणारे चक्रधर गुजरातमध्ये जन्माला आले. पण त्याने आपल्या अनुयायांना महाराष्ट्रात राहावे, मराठी भाषेत बोलावे, लिहावे अशी आज्ञा दिली. संत नामदेव, गुरुनानकदेव यांनीही आपले विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. वेदातील अन्यायाला विरोध करणारे संत बहुजनवादी होते. आपली भूमिका लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी बोलणे हाच त्यांचा प्रमुख

आधार होता. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांनी म्हटले आहे की, लोक जी भाषा बोलतात आणि जी त्यांना समजते ती लोकवाणी. लोकांनाही समजत नाही; पण जिच्यामुळे पंडितांच्या पांडित्याचे प्रदर्शन थाटले जाते ती पंडितवाणी. ज्ञानेश्वरांच्यानंतर तीनशे वर्षांनी जन्मलेल्या संत एकनाथांपर्यंत लोकवाणीविरुद्ध पंडितवाणी हा संघर्ष सुरू होता. पंडितांना पांडित्याचा अभिमान, तर लोकसेवक वक्त्यांना लोकांचा जिव्हाळा आत्मसात करण्याची तळमळ होती. कृतिशील संतांनी आपल्या वाणीद्वारा समाजात सकारात्मक बदल करण्याचा प्रयत्न केला.

मौखिक संस्कृती हा आपल्या सार्वजनिक जीवनाचा मुख्य आधार आहे. कोणतीही भाषा शिकताना ऐकणे, बोलणे, लिहिणे, वाचणे ही चार भाषिक कौशल्ये महत्त्वाची आहेत. आपली भाषा शिकण्याची प्रक्रिया आठवून बघा. मूल १०/११ महिन्यांचे झाल्यानंतर वेगवेगळे आवाज काढते. तत्पूर्वी ते दीर्घकाळ ऐकत असते. मग आपण या आवाजांना प्रशिक्षण देतो. मूल आई म्हणते, बाबा म्हणते, असं सांगत राहातो. या बोलण्याचा शोध पन्नास हजार वर्षांपूर्वी लागला. माणूस हा बोलणारा प्राणी आहे. प्राण्यांची भाषा व मानवी भाषा यात फरक आहे. महाराष्ट्र अथवा इंग्लंडमधील कुत्रा सारख्याच पद्धतीने भुंकतो. माणूस मात्र वेगळी भाषा बोलतो. भाषेविषयी उपजत कौशल्याला ऐकणे व बोलणे याची जोड दिली की, संवाद विकसित होतो. आपल्या संस्कृतीत लिहिणे व वाचणे या गुंतागुंतीच्या भाषिक कौशल्यापेक्षा ऐकणे व बोलणे या कौशल्यावर आधारित मौखिक परंपरा महत्त्वाची आहे. मौखिक परंपरेमुळे आपल्याकडे अनेक निरक्षर माणसांना अभंग, ओव्या, लोकगीते तोंडपाठ असतात.

संत तुकाराम महाराज व रामदासांच्या काळापासून कीर्तनकला विकसित झाली. कीर्तन म्हणजे यशाचे वर्णन. कीर्तनकारांनी पौराणिक कथांचे निरूपण करीत ज्ञान व रंजन यावर आधारित समाजप्रबोधन केले. संत ज्ञानेश्वरांनी वाणीत कवित्व व रसिकत्व असावे, असे म्हटले आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास या संतांनी लेखन करताना श्रोत्यांना आवाहन केले आहे. आपले लेखन हे वाचण्याबरोबरच ऐकले जाणार आहे, याची या संतांना जाणीव आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या मते, संत तुकाराम हे पहिले विख्यात कीर्तनकार होत. संत तुकारामांनी अंधश्रद्धा व कर्मकांडांना विरोध करीत व कीर्तनातून सामाजिक समतेचा प्रसार केला. वारकरी संप्रदायात बहिणाबाई ही महिला कवी वज्रसूचीसारख्या ग्रंथावर आपल्या अभंगातून भाष्य करते. मराठी संत कृतिशील विचारवंत होते. संतांनी निर्माण केलेल्या आध्यात्मिक वातावरण निर्मितीचा शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी मावळे गोळा करताना उपयोग झाला. प्रतिकूल परिस्थितीत कल्याणकारी राज्य स्थापन करताना शिवाजी महाराज उत्तम संघटक, नेते व वक्ते म्हणून वावरले असणार. कीर्तन, प्रवचन, भजन, तमाशा, गोंधळ या सादरीकरणाच्या कला मौखिक परंपरेने टिकवून ठेवल्या. कीर्तनाचे महत्त्व सांगताना प्रा. राम शेवाळकर यांनी म्हटले आहे की, कीर्तनकारांनी संत कवी आणि पंत कवी यांचे साहित्य बहुजन समाजापर्यंत पोहोचवले. कीर्तनामुळे समाजाचे लालित्यपूर्ण प्रबोधन होते. रंजन व उद्‌बोधन करणारा कीर्तनकार हा एकपात्री बहुरूपी उपदेशक होय. चांगल्या कीर्तनकाराकडे वक्तृत्व, संगीत, अभिनय, व्यासंग, बहुश्रुतता या बाबी असाव्या लागतात. कीर्तनकारांनी पूर्वरंगासाठी संत कवी, तर उत्तररंगासाठी पंडित कवींचा वापर केला. संतांची व पंतांची कविता श्रोत्यांपर्यंत पोहोचवली. आख्यान कवींना लोकप्रिय बनवले. कीर्तन संस्थेने संतसाहित्याबद्दल भक्ती व पंडित कवितेबद्दल प्रेम निर्माण केले. कीर्तन प्रकाराचे अभ्यासक डॉ. वि.मा.दी. पटवर्धन यांनी सांगितलेला किस्सा असा : कुंभकर्ण मेला. त्याची बायको निद्रा विधवा झाली. ती कीर्तनाला आली. त्यामुळे कीर्तन ऐकणारे सारे पेंगू लागले. म्हणून श्रोत्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी कीर्तनकार टाळ्या वाजवा, अभंग म्हणा, राम कृष्ण हरी, जय जय राम-कृष्ण हरीचा जयघोष करा, अशा वारंवार सूचना देऊन श्रोत्यांचे अवधान खेचून घेतो. कीर्तनाच्या बरोबरीने तमाशा कलावंतांनी बतावणी व वगनाट्याच्या सादरीकरणात बोलण्याचे महत्त्व लोकांच्या निदर्शनास आणले. ओव्या, लावण्या व फटके लिहिणारा अनंत फंदी अहिल्यादेवी होळकरांच्या सल्ल्यानंतर तमासगिरी सोडून हरदास झाला. काही ऋषींनी वाणीचा उल्लेख जाया असा केला आहे.

(पृष्ठ क्रमांक २७ वर )



# बुद्धिवादी फाऊंडेशन, बिहार : एक परिचय

डॉ. रमेंद्र
८७५७३७०१९२

'बुद्धिवादी फाऊंडेशन' या 'ना नफा' तत्त्वावर चालणाऱ्या नोंदणीकृत शैक्षणिक न्यासाची (ट्रस्टची) स्थापना बिहारमधील पाटणा येथे १९९६ साली झाली. या ट्रस्टचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. रमेंद्र आहेत, तर तहहयात सदस्य स्वतः डॉ. रमेंद्र, तसेच डॉ. कंवलजीत कौर, डॉ. किरण नाथ आहेत आणि स्वीकृत विश्वस्त प्रिया नाथ या आहेत. संघटनेचे उद्दिष्ट बुद्धिवाद आणि मानवतावादाचा प्रचार-प्रसार करणे; तसेच सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांना प्रतिरोध करणे हा आहे. बुद्धिवाद आणि मानवतावादाचा प्रचार-प्रसार करणे यामध्ये (तर्क-संगत) वैज्ञानिक चिंतन तसेच तर्कसंगत, धर्मनिरपेक्ष आणि मानवी नैतिकतेचा प्रचार करणे यांचा अंतर्भाव आहे.

ट्रस्टचे विविध उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत :

**१) हिंदी आणि इंग्रजी भाषेत पुस्तक-पुस्तिका, पत्रिका, फोल्डर, हस्तपत्रके इत्यादींचे प्रकाशन आणि प्रकाशनासाठी मदत :** बुद्धिवादी फाऊंडेशनने मुख्यतः ऑफसेट प्रिंटिंगशिवाय ॲमॅझोनवर पीओडी (Print on Demand) आणि किंडल बुक्स, smashwords वर मल्टी-फॉरमॅट ई-बुक्स आणि pothi.com वर इंग्रजी आणि हिंदीमध्ये पीओडी आणि पीडीएफ ई-बुक्स स्वरूपात प्रकाशन केले आहे. फाऊंडेशनद्वारा smashwords आणि pothi.com वर प्रकाशित बहुतेक ई-बुक्स मोफत डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहेत. बुद्धिवादी फाऊंडेशनचे सहामाही मुखपत्र 'बुद्धिवादी'चे प्रकाशन ऑफसेट मुद्रण आणि पीडीएफमध्ये केले जाते. कोरोना महामारीमुळे या मुखपत्राचे वेळापत्रक बिघडले असले, तरी ते रुळावर आणण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**२) अभ्यासकेंद्र आणि ग्रंथालयांची स्थापना आणि स्थापनेसाठी मदत :** अनेक ग्रंथालयांना, अभ्यासकेंद्रांना आणि सहयोगी संघटनांना फाऊंडेशनद्वारा प्रकाशित पुस्तक-पुस्तिकांचा एक संच भेट म्हणून मोफत दिला जातो.

**३) बुद्धिवादी-मानवतावादीदृष्टीने शोधास प्रोत्साहन :** बुद्धिवादी फाऊंडेशनद्वारा एक बुद्धिवादी संशोधन केंद्र संचालित केले जाते. याअंतर्गत बुद्धिवादी सेमिनार हॉलमध्ये एक संदर्भ ग्रंथालय आहे, ज्यात बुद्धिवादी फाऊंडेशनसह वेगवेगळ्या भारतीय आणि आंतरराष्ट्रीय बुद्धिवादी, मानवतावादी, नास्तिक-निरीश्वरवादी आणि धर्मनिरपेक्ष संघटनांद्वारा मुख्यतः हिंदी आणि इंग्रजीतून प्रकाशित साहित्य-पुस्तक, पुस्तिका, पत्रिका, स्मरणिका, फोल्डर इत्यादींचा समावेश होतो. या ग्रंथालयात हिंदी आणि इंग्रजी व्यतिरिक्त भोजपुरी, उडिया, बांगला, पंजाबी, मराठी, गुजराती, तेलगु आणि मल्याळम् भाषेतील पुस्तकेदेखील उपलब्ध आहेत. बुद्धिवादी रिसर्च सेंटरच्या प्रेरणेने आणि मदतीने पाटणा विद्यापीठात आणि बिहार राज्यातील अनेक विद्यापीठांमध्ये देवदासी प्रथा, महात्मा जोतिराव फुले, सावित्रीमाई फुले, फातिमा शेख, पेरियार, मानवेंद्र नाथ रॉय, डॉ. आंबेडकर, जयप्रकाश नारायण यांचे 'संपूर्ण क्रांती', डॉ. लोहिया यांचे 'सप्तक्रांति', अमर्त्य सेन यांचे नैतिक विचार, राहुल सांकृत्यायन यांचे धर्म-दर्शन, सिजविक, कार्ल पापर, कॉर्लिस लामोंट, पीटर सिंगर, तर्कशास्त्र, विज्ञान-तत्त्वज्ञान आणि नारीवाद यांसह व्यावहारिक नीतिशास्त्राच्या विविध पैलूंवर पीएच.डी. शोधनिबंध झाले आहेत किंवा त्यावर संशोधन चालू आहेत. झालेल्या शोधांपैकी अनेकांचे प्रकाशन बुद्धिवादी फाऊंडेशनद्वारा केले गेले आहे आणि भविष्यातही केले जाईल. 'बुद्धिवादी'चा जानेवारी, २०१८चा अंक नारीवादावर होता. त्यामध्ये डॉ. कंवलजीत कौर, डॉ. किरण नाथ आणि प्रिय नाथ अतिथी संपादक होते. (आता हे सारे डॉ. रमेंद्र यांच्यासोबत 'बुद्धिवादी'च्या संपादक मंडळात सदस्य आहेत.) या विशेषांकात 'नारीवादी आंदोलन की सोच' आणि अन्य

साहित्याशिवाय सावित्रीमाई फुले आणि फातिमा शेख यांच्याविषयी माहिती प्रकाशित केली होती. गेल्या काही वर्षांपासून 'बुद्धिवादी'च्या सर्व अंकांची निम्मी पाने लिंग-समानता किंवा नारीवाद या विषयावर असतात, ज्यांचे संपादन संपादक मंडळातील महिला सदस्यांद्वारा केले जाते. यातील कित्येक लेख संशोधनात्मक असतात.

**४) इंटरनेटच्या माध्यमातून बुद्धिवाद-मानवतावादाचा प्रचार-प्रसार :** बुद्धिवादी फाऊंडेशनद्वारा एक वेबसाइटदेखील चालवली जाते. जुनी वेबसाइट हॅक (अपहरण) झाल्यावर नवीन वेबसाइट निर्माण करण्याचे काम चालू आहे. याशिवाय फेसबुकवर बुद्धिवादी फाऊंडेशनचे वेब पेज आहे, ज्यामार्फत बुद्धिवादी फाऊंडेशनची लक्ष्ये आणि उपक्रमांची माहिती दिली जाते. या फेसबुक पेजवर बुद्धिवादी फाऊंडेशनच्या प्रकाशनांच्या माहिती व्यतिरिक्त फोटो आणि चित्रफितींच्या माध्यमातून बुद्धिवादी फाऊंडेशनच्या तसेच समाजातील घडामोडींची माहिती उपलब्ध केली जाते. यामध्ये बुद्धिवादी समाजच्या निवेदनांना, वक्तव्यांनादेखील स्थान दिले जाते. प्रकाशनांच्या संदर्भात उल्लेख केल्याप्रमाणे बुद्धिवादी फाऊंडेशनद्वारा amazon, smashwords आणि pothi.com वर सुद्धा साहित्य प्रकाशित केले जाते.

याशिवाय डॉ. आंबेडकर अध्यासन, पाटणा विद्यापीठातर्फे लॉकडाऊनच्या काळात जून २०२०च्या प्रत्येक शनिवारी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांच्या वेगवेगळ्या पैलूंवर चार वेबिनारांचे आयोजन केले गेले होते. चौथ्या वेबिनारच्या शेवटी डॉ. आंबेडकर अध्यासन, पाटणाचे उद्घाटनही केले गेले होते आणि ते या वेबसाइटवर प्रसिद्ध सुद्धा करण्यात आले होते. हे सर्व कार्यक्रम बुद्धिवादी फाऊंडेशनद्वारा प्रायोजित करण्यात आले होते. तसेच याची माहिती बुद्धिवादी फाऊंडेशनच्या फेसबुक वेब पेजवरदेखील दिली गेली होती. या चारही वेबिनारांची संपूर्ण माहिती युट्यूबच्या पुढील लिंकवर पाहाता येईल. (https://www.youtube.com/playlist?list=PLt5hxPkE3PD8-cuQqxnU22TrZvoFZPpdl)

**'बुद्धिवादी समाज' आणि 'बुद्धिवादी फाऊंडेशन'**

बुद्धिवादी समाज आणि बुद्धिवादी फाऊंडेशन या दोन स्वतंत्र संघटना आहेत. बुद्धिवादी समाज ही एक सदस्य-संघटना आहे, तर बुद्धिवादी फाऊंडेशन हा नोंदणी केलेला, ना नफा तत्त्वावर चालणारा शैक्षणिक ट्रस्ट आहे. परंतु दोन्ही संघटनांचे संस्थापक एकच आहेत म्हणून या दोन्ही संघटनांमध्ये सहयोगी आणि पूरक संबंध आहेत. उदाहरणार्थ, साहित्य प्रकाशन हे बुद्धिवादी समाजच्या मुख्य कार्यांपैकी एक होते; परंतु १९९८ पासून हे काम बुद्धिवादी फाऊंडेशन करत आहे. 'बुद्धिवादी'चे प्रकाशन १९८७ पासून १९९७ पर्यंत बुद्धिवादी समाजद्वारा केले जात होते. मात्र जानेवारी १९९८ पासून हे प्रकाशन बुद्धिवादी फाऊंडेशनद्वारा केले जात आहे. बुद्धिवादी समाजची स्थापना जानेवारी १९८५ मध्ये, 'बिहार बुद्धिवादी समाज'च्या रूपाने बुद्धिवाद, मानवतावाद, निरीश्वरवाद आणि धर्मनिरपेक्षता यांच्या प्रचार आणि प्रसारासाठी केली होती. कामाचा विस्तार झाल्यावर २००५ साली बिहार बुद्धिवादी समाजची वीस वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त आयोजित समारंभात सदस्यांच्या सर्व संमतीने संघटनेचे नाव 'बुद्धिवादी समाज' असे बदलण्यात आले. याप्रसंगी बुद्धिवादी फाऊंडेशनने 'बिहार बुद्धिवादी समाज के वीस वर्ष: १९८५ से २००५' या शीर्षकाची पुस्तिकासुद्धा प्रकाशित केली होती, ज्याच्या काही प्रती आजही उपलब्ध आहेत.

वैचारिक संवाद, बैठका, व्याख्याने, संमेलन सभा, प्रदर्शने यांचे आयोजन, वृत्तपत्रांमध्ये निवेदने आणि पत्रलेखन, सर्व धर्मांतील रूढीवाद आणि धर्मांधता यांना प्रतिरोध, अंधश्रद्धा आणि चमत्कारांचा भांडाफोड, स्वखुशीने केल्या जाणाऱ्या आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांना पाठिंबा यावर काम केले जातेच; शिवाय 'बुद्धिवादी समाज'ने नेटवर्किंगच्या कामावरदेखील लक्ष केंद्रित केले आहे. २००० साली 'बुद्धिवादी फाऊंडेशन'ने 'बुद्धिवादी निर्देशिका'चे प्रकाशन केले. ज्यामध्ये सक्रिय असलेल्या ५१ संघटनांची माहिती दिली गेली होती.

कोविड महामारीमुळे बुद्धिवादी समाजच्या काही उपक्रमांवर परिणाम झाला. आता ते सर्व सुरळीत केले जात आहे. 'बुद्धिवादी समाज' के मित्र या नावाने एक व्हॉट्सअप ग्रुप निर्माण केलेला आहे. बुद्धिवादी समाजचा अध्यक्ष या नात्याने मी महत्त्वपूर्ण अशा सामायिक विषयांवर निवेदने दिलेली आहेत. जी बुद्धिवादी

फाऊंडेशनच्या फेसबुक पेजवर उपलब्ध आहेत. याचा प्रसार सोशल मीडियावर केला गेला आहे. लवकरच बुद्धिवादी मित्र मिलन समारंभ आयोजित करण्याचा विचार आहे. ज्यामध्ये सहभोजनाबरोबरच 'बुद्धिवादी' छापील स्वरूपात प्रसिद्ध केले जाईल आणि फाऊंडेशन/समाजद्वारा प्रकाशित केलेल्या साहित्याचे प्रदर्शन लावण्यात येईल.

अनेक लोक बुद्धिवादी फाऊंडेशनसोबत जोडून घेण्याची इच्छा प्रकट करीत आहेत. परंतु फाऊंडेशन हा एक ट्रस्ट आहे. ज्यांना या कार्याशी जोडून घ्यावेसे वाटते ते 'बुद्धिवादी समाजचे सदस्य होऊ शकतात. बुद्धिवादी फाऊंडेशनची काही मुख्य प्रकाशने पुढीलप्रमाणे आहेत : १. अंधविश्वास के विरुद्ध २. क्या ईश्वर मर चुका है? ३. मैं हिन्दू क्यों नहीं ४. मैं बुद्धिवादी कैसे बना ५. पेरियार : जीवन और विचार ६. अमीर और गरीब ७. शराब, सेक्स और नीतिशास्त्र ८. Is God Dead ९. Why I am Not a Hindu १०. The Myth of Unity of All Religions ११. Some Reflections on Ethics, १२. Philosophy of Love (सभी डॉ. रमेंद्र) १३. जोतिराव फुले १४. FQ on Rationalism, Humanism and Atheism १५. JP's Total Revolution and Humanism (सभी डॉ. कंवलजीत) १६. डॉ. आंबेडकर : जीवन और विचार १७. Rationalism, Humanism and Atheism in Twentieth Century Indian Thought (डॉ. रमेंद्र एवं डॉ. कंवलजीत) १८. आस्तिक-नास्तिक संवाद (नारगोलकर एवं रमेंद्र) १९. वर्ण-व्यवस्था के विरुद्ध बुद्ध का आंदोलन (डॉ. किरण नाथ) २०. देवदासी प्रथा : कितना सही, कितना गलत (डॉ. शेखर कुमार जैसवाल) २१. बुद्धिमानी और नासमझी (Ravipudi Venkatadri)

संघटनेचे नोंदणीकृत कार्यालय : २१६-ए, श्रीकृष्णपुरी, पटना-८००००१

ई-मेल : dr.ramendra.nath@gmail.com

kawaljeetkaur.patna@gmail.com

वेबसाइट : http://buddhiwadi.in

फेसबुक पेज : Buddhiwadi Foundation

अनुवाद : उत्तम जोगदंड

•




दि शेगाव

# श्री अग्रसेन

## सहकारी पतसंस्था मर्यादित, शेगाव

र.नं. १०४, जि. बुलढाणा, कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य


**अल्पावधीत पंधरा शाखांसह आर्थिक स्थैर्याकडे वाटचाल करणारी एकमेव पतसंस्था**



# महा. अंनिसच्या कार्याचा गौरव करणारी 'महाराष्ट्राची लोकयात्रा'

**प्रा. नरेश आंबिलकर, भंडारा**
**९४२३११२१८१**

महाराष्ट्रातील ख्यातनाम लेखक डॉ.सदानंद मोरे यांनी महाराष्ट्रातील सामाजिक संघर्ष आणि चळवळी यांचा समर्पक इतिहास 'महाराष्ट्राची लोकयात्रा' या ग्रंथातून रेखाटला आहे. सदर ग्रंथात ज्या सामाजिक चळवळींमुळे महाराष्ट्रात विशेष बदल घडून आले अशा सामाजिक चळवळींचा इतिहास समर्पक शब्दांतून सांगितला आहे. महाराष्ट्रातील संतांनी मध्ययुगीन कालखंडात सामाजिक, आध्यात्मिक क्षेत्रात केलेल्या कार्याचे विवेचन करण्यात आले आहे. आधुनिक काळात सुधारकांनी महाराष्ट्रात केलेल्या सुधारणा आणि त्यासाठी महाराष्ट्रात गठित केलेल्या सामाजिक चळवळींचे वर्णन या ग्रंथातून डॉ. सदानंद मोरे यांनी केले आहे. उपनिषदातील ब्रह्मवाद, गौतम बुद्ध, मध्ययुगीन मराठी वारकरी संतपरंपरा, आधुनिक समाजसुधारक आणि भारतीय संविधान असा समतेचा प्रेरक प्रवास विवेकवादी डॉ. नरेंद्र दाभोलकरांपर्यंत त्यांनी आणून सोडला आहे, असे मत या ग्रंथाच्या प्रस्तावनेत राजा दीक्षित यांनी मांडले आहे.




'महाराष्ट्राची लोकयात्रा' या ग्रंथाचा समारोप डॉ.सदानंद मोरे यांनी 'सानेगुरुजी ते नरेंद्र दाभोलकर' या लेखाने केला आहे. या लेखात डॉ.नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्रातील समाजपरिवर्तनासाठी केलेल्या कार्याची विशेष ओळख करून दिली आहे. सोबतच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने महाराष्ट्रात केलेल्या कार्याचे आणि या कार्याचे मूळ कोणत्या गोष्टीत आहे हे सुद्धा जाता जाता अधोरेखांकित करण्याचा प्रयत्न केला आहे. र. धों. कर्वे यांची केवळ विचारसरणीचा व भूमिकेचा विचार केला, तर तिला बुद्धिप्रामाण्यवादी असे म्हणता येईल. ही भूमिका घेऊन कार्य करणाऱ्यांमध्ये डॉ. नरेंद्र दाभोलकर, डॉ. श्रीराम लागू आदींचा व अनुषंगाने त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीमार्फत चालवलेल्या कार्याचा विशेष उल्लेख करावा लागेल, असे मत डॉ. सदानंद मोरे यांनी मांडले आहे. या लेखात ते म्हणतात, ''दाभोलकरांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीला पूर्णवेळ वाहून घेतले होते. दाभोलकरांनी लिहिलेल्या पंढरीच्या वारीवरील लेखाला त्यांनी वारीवरील सर्वोत्तम लेख संबोधले आहे.'' डॉ. मोरे यांच्या मते, ''दाभोलकर आस्तिक होते की नास्तिक होते, हे त्यांना नक्की सांगता येत नाही. पण त्यांचा याबाबतचा कल दाभोलकरांना अज्ञेयवादी मानण्याकडे आहे.''

'अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य हे धर्माच्या विरोधात नव्हते, विशिष्ट धर्माच्या विरोधात असणे इतके ते संकुचितही नव्हते. धर्म मानणाऱ्या व्यक्तीला या कार्याकडे धर्मशुद्धीचे कार्य असेही पाहाता येणे शक्य आहे. या अर्थाने ते धर्माला पूरक होते. त्यांनी प्रस्तावित केलेल्या जादूटोणाविरोधी कायद्याला वारकरी संप्रदायाचा पाठिंबा मिळवण्यात डॉ. मोरे यांना यश आले. कारण प्रचार केला जात होता त्याप्रमाणे ते धर्माचे शत्रू नसून मित्रच आहेत. इतकेच नव्हे, तर संतांनीही अशा प्रकारचे कार्य केले आहे, या निष्कर्षापर्यंत वारकरी संप्रदायचे लोक आले व त्यांनी विधेयकाला पाठिंबा दिला. विधेयकाचे रूपांतर हे कायद्यात होऊ शकले. दुर्दैवाने हे यश पाहायला डॉ. दाभोलकर हयात नव्हते', अशी खंतही त्यांनी व्यक्त केली आहे.

डॉ. दाभोलकर समाजवादी विचारांशी व सेवादलाशी निगडित होते. इतकेच नव्हे, तर सानेगुरुजींनी पायाभरणी केलेल्या साप्ताहिक 'साधना'चे ते संपादक होते. गुरुजींनी पंढरपूरचा विठ्ठल अस्पृश्यांसाठी खुला व्हावा म्हणून उपोषण करून तो प्रश्न मार्गी लावला. दाभोलकरांचे कार्य हे डॉ. मोरे यांच्या मते, गुरुजींच्याच

कार्याचे विस्तारीकरण असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. 'सानेगुरुजींची मागणी व ती पूर्ण होण्यासाठी त्यांनी केलेले उपोषण हे तेव्हाच्या सनातन्यांना धर्मद्रोहाचे कृत्य वाटत होते. डॉ. दाभोलकरांची अंधश्रद्धाविरोधी मोहीम आताच्या काळातील सनातनी प्रवृत्तीच्या लोकांना धर्मद्रोही वाटली', असे ते म्हणतात. डॉ. दाभोलकरांनी सानेगुरुजींची परंपरा पुढे नेली, असे मत मोरे यांनी या महाराष्ट्राच्या लोकयात्रेत व्यक्त केले आहे.

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे कार्य आणि त्यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला आजच्या सामाजिक चळवळीत एक महत्त्वाचे स्थान असल्याचे या पुस्तकात प्रतिपादन केले आहे. सामाजिक चळवळींचा महाराष्ट्राच्या संतकाळापासून ते आतापर्यंतचा इतिहास समजून घ्यायचा असेल, तर डॉ. सदानंद मोरे देहूकर यांचा 'महाराष्ट्राची लोकयात्रा' हा ग्रंथ एकदा वाचायलाच हवा.

**'महाराष्ट्राची लोकयात्रा'**

लेखक : डॉ. सदानंद मोरे

प्रकाशक : सकाळ प्रकाशन, पुणे

स्वागतमूल्य : १२९९/-

पृष्ठसंख्या : ७२४

•

---

(पृष्ठ क्रमांक २२ वरून )

आपल्या देशातील वक्तृत्व सकस मौखिक परंपरेचा आधार घेऊन उभे राहिले आहे. मौखिकता सलग असते. ती ग्रामीण असते. तिच्यात लोकांचा सहभाग असतो. मौखिकता कृषी व ग्रामीण संस्कृतीशी चिकटून असते. महानुभाव पंथाचे साहित्य मौखिक परंपरेमध्ये टिकून राहिले. लेखक माहीत नसलेली अनेक गीते बाया-बापड्यांना तोंडपाठ आहेत. आपण असे म्हणतो की, संत तुकारामांचे अभंग इंद्रायणीत बुडवले. हे अभंग आपल्या मौखिक परंपरेने टिकवले. तुकारामांचा अनुयायी त्र्यंबक कासार व पुतण्या यांनी गावोगाव फिरून मौखिक परंपरेने टिकवून ठेवलेले अभंग संकलित केले. अलेक्झांडर ग्रँड या ब्रिटिश अधिकाऱ्याने हे संग्रहित अभंग 'तुकारामाची गाथा' म्हणून प्रसिद्ध केले. आज आपल्याकडे उपलब्ध असलेली ४५०० अभंगाची गाथा ही या मौखिक परंपरेतून टिकून राहिली. आपली मंदिरे तर धर्मशिक्षणाबरोबरच समाजशिक्षणाची अनौपचारिक केंद्रेच होती.

बोलण्याचा शोध पन्नास हजार वर्षांपूर्वी लागला. लिहिण्याचा शोध दहा हजार वर्षांपूर्वी लागला. पण ९१-९२ नंतर इंटरनेटने अतिशय वेगाने जगाचा ताबा घेतला. पहिल्या महायुद्धानंतर अमेरिका, तर दुसऱ्या महायुद्धानंतर आपण रशियाला शक्तिमान राष्ट्र मानतो. पण कोरोनाविरुद्धच्या तिसऱ्या युद्धानंतर इंटरनेटने जगाचा ताबा घेतला आहे. अगदी आजही Well Had या इंग्रजी शब्दाला बहुश्रुत हा चांगलं ऐकण्याशी संबंधित मराठी प्रतिशब्द आहे. मौखिक परंपरा हा आपल्या देशी वक्तृत्वाचा आधार आहे. धर्मसंस्थापकांनी धर्म व पंथाच्या प्रचारासाठी वक्तृत्वाचा आधार घेतला. कृतिशील विचारवंतांचे योगदान महत्त्वाचे ठरले. वक्तृत्वाच्या औपचारिक पाश्चात्त्य परंपरेच्या तुलनेत आपली वक्तृत्वाची अनौपचारिक मौखिक परंपरा आहे. आपण आपली मौखिक परंपरा व सर्वव्यापी इंटरनेट यांची सांधेजोड केली पाहिजे. चांगल्या वक्त्यांच्या भाषणांचे व्हिडिओ पाहाणे, आपण स्वतः केलेल्या भाषणाचे व्हीडीओ पुन्हा पुन्हा ऐकणे, हा नव्या स्वरूपात मौखिक परंपरेचा आधुनिक वापरच आहे. तो अभ्यासाचा पद्धतशीर भाग बनवला पाहिजे. ब्रिटिशांनी मेकॉलेच्या Filteration theory (झिरपणीचा सिद्धांत) म्हणजे वरच्या वर्गांना शिकवा, खालचे आपोआप शिकतील या सिद्धांताचा वापर करून शिक्षण विस्तार केला. पण आपल्या देशी परंपरेतील विचारवंतांनी Upward Filteration Theory चा वापर करून तळागाळातल्या बहुजनांना शिक्षण द्यावे, असा आग्रह धरला. हे लोकशिक्षक विचारवंत आणि ब्रिटिश सत्तेविरोधात उभा राहिलेला स्वातंत्र्यलढा या माध्यमातून अनेक वक्ते व्यासपीठ गाजवू लागले. वक्तृत्वाचा, जनसंवादाचा प्रभावी माध्यम म्हणून वापर करू लागले. व्यवस्था परिवर्तनाचा आग्रह धरणाऱ्या या वक्त्यांपैकी काही वक्त्यांच्या आशय व शैलीचा परिचय आपण पुढच्या भागात पाहू.

(लेखक पत्रकार व प्रतिथयश वक्ते आहेत.)

•



# कार्याध्यक्ष संवाद

**माधव बावगे**
**९४०४८७०४३५**

प्रिय साथी,

आपण प्रकृतीच्या दृष्टीने कसे आहात? आणि संघटनेच्या पातळीवर शाखांची स्थिती कशी काय आहे? परवा औरंगाबाद येथे राज्य कार्यकारी समितीची ऑफलाईन बैठक झाली. एकूण शाखांचा आढावा घेतला असता, अजून निम्म्या शाखांच्या नवीन कार्यकारिणी यायच्या राहिल्या आहेत. काही शाखा झाल्या, पण त्या मध्यवर्तीकडे पाठवल्या गेल्या नाहीत. आपली स्वयंशिस्त तपासली, तर केवळ थोडासा आळस दिसून येतो. तो झटकून त्या त्या वेळची कामे त्या त्या वेळी करणे अपेक्षित आहे. आपण ठरवल्याप्रमाणे जिल्ह्यातील किमान पाच शाखा आल्या तरी जिल्हा प्रेरणा मेळावे घेत आहोत. याचा अर्थ, उर्वरित शाखा कार्यकारिणी येणे आवश्यकच आहे. यथावकाश प्राधान्याने त्या मिळवणे आवश्यक आहे.

साथी एकूण पाहिले, तर आपण सर्वजण जोमाने काम करीत आहात आणि कार्यक्रमांच्याबाबतीत आपली सर्वांची वेगात घोडदौड चालू आहे. असा एकही दिवस जात नाही की, ज्या दिवशी एकाही शाखेवर एकही कार्यक्रम झाला नाही. तसेच स्थानिक पातळीवर काही अंधश्रद्धांच्या घटना घडल्या, तर त्याचा प्रतिवाद लगेच केला जातोय, ही बाब अतिशय चांगली आहे. त्याचबरोबर बुवाबाजी प्रकरणे हाताळणेही गरजेचे आहे. कारण अशा उपक्रमांमुळे संघटना लोकांपर्यंत सकारात्मकदृष्ट्या पोहोचते. उपक्रमशील राहाणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि आपण सारेजण उपक्रमशील आहात याचे कौतुक आहे आणि आपल्याबद्दल मला अभिमान वाटतो. साथी आपल्या संघटनात्मक शाखांचा स्तर आपल्या सर्वांना चांगला माहिती आहे. लीड शाखा, क्रियाशील शाखा, उपक्रमशील शाखा, संपर्क शाखा. मित्र-मैत्रिणींनो, शाखांच्या पातळीवर आपण शेवटच्या दोन टप्प्यातच आहोत. संघटनात्मकदृष्ट्या पहिले दोन टप्पे अधिक महत्त्वाचे आहेत. उपक्रमांच्या पातळीवर कितीही चांगले उपक्रम आपण राबवित राहिलो आणि त्याचा संघटनात्मक ढाचा मजबूत नसेल तर त्याचा उपयोग नाही. डॉक्टर नेहमी म्हणायचे, एखादा उपक्रम कमी झाला तरी चालेल; पण आपली संघटनात्मकशक्ती अधिक मजबूत असली पाहिजेत. प्रशिक्षित कार्यकर्ते तसेच शाखा व जिल्हास्तर मजबूत असणे हे अधिक महत्त्वाचे आहे. तो संघटनेचा मूळ पाया आहे. ज्या संघटनेचा पाया मजबूत असतो ती संघटना अविरतपणे विकेंद्रित कार्यपद्धतीने क्रियाशील राहाते म्हणून आपण उपक्रमाबरोबरच थांबलेल्या शाखा पुनर्जीवित करणे, संपर्क शाखांना उपक्रमशील करणे, उपक्रमशील शाखांना क्रियाशील करणे, क्रियाशील शाखांना लीड शाखात रूपांतरित करणे ही सततची संघटनात्मक प्रक्रिया आहे. हे सर्व जिल्हा शाखांनी ध्येयाने प्रेरित होवून सातत्याने करीत गेले तर सर्व शाखा ह्या क्रियाशील व लीड करण्याचे ध्येय आपण लवकरच पूर्ण करू शकू. त्याचप्रमाणे कार्यकर्ता पातळीवर त्याने स्वतः दरवर्षी सभासद फॉर्म भरणे, अंनिपचा सभासद होणे, सर्व प्रशिक्षण शिबिरात उपस्थित राहाणे, शाखा, जिल्हा व आवश्यकतेप्रमाणे राज्य बैठकांना उपस्थित राहाणे, संघटनेसाठी देणग्या, जाहिरातीद्वारे निधी जमवणे हे सर्व नॉन-रिवार्डिंग काम आहे. जे कार्यकर्ते हे नॉन-रिवार्डिंग काम करतात ते संघटनेचे मूळ आधारस्तंभ असतात आणि हीच आपल्याकडून रास्त अपेक्षा आहे. साथी आपण सर्वजण प्रामाणिक आहात. आपल्या दैनंदिनीमधून वेळ काढून संघटनेसाठी देताहात, स्वतःची पदरमोड करून बैठकांना उपस्थित राहात आहात, याबद्दल आपले जाहीरपणे कौतुक करतो आहे. परंतु काही कार्यकर्ते अधिक काम करतात त्यामुळे संघटना क्रियाशील दिसते. परंतु ही कृती सर्व कार्यकर्त्यांकडून अपेक्षित आहे. परंतु थोडेसे खेदाने नमूद करावेसे वाटते की, डिसेंबरमध्ये शाखा कार्यकारिणी

**(पृष्ठ क्रमांक ३६ वर )**

# महाराष्ट्र अंनिसची खबरबात



**अनिल शोभना वसंत, पालघर**
**९८२३२८०३२७**

**धुळे जिल्हा कार्यकारिणी बैठकीने झाले शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर सभागृहाचे उद्घाटन:**

धुळे जिल्हा कार्यकारिणीची बैठक १४ फेब्रुवारी रोजी संपन्न झाली. शिंदखेडा येथे या बैठकीचा आयोजन करण्यात आले होते. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पतसंस्थेत शहीद डॉ.नरेंद्र दाभोलकर सभागृहात बैठक होऊन आज सभागृहाचे उद्घाटनदेखील झाले. बैठकीला शिंदखेडा -७, धुळे-५, देऊर -१, शिरपूर-१, वाघाडी -६, साक्री-१, कासारे-६, पिंपळनेर-६ अशा सर्व शाखांचे क्रियाशील सभासद हजर होते. बैठक सकाळी ११:०० वाजता सुरू झाली. सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत चालली. बैठकीला संघटनात्मक आणि उपक्रम दोन्ही पातळीवर सविस्तर चर्चा झाली. कामाचा उत्साह वाढला. प्रेरणा मिळाली.

**पनवेल शाखेचे महिलांसाठी 'झेप' शिबिर संपन्न**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची पनवेल शाखा दरवर्षी महिलांसाठी झेप - एक भरारी आत्मसन्मानासाठी या शिबिराचे आयोजन करते. हे शिबिराचे सातवे वर्ष होते. या पार पडलेल्या शिबिरात महाराष्ट्राच्या विविध भागांतून महिला सहभागी झाल्या होत्या. अनोख्या पद्धतीने शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटक म्हणून right to pee च्या सुप्रिया उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना सहभागी करत संवाद साधला. LGBTQ+ समूहातील मयुरी हिची मुलाखत झाली, तर श्रीराम कोळी यांच्या टीमने ॲडव्हेंचर ॲक्टिव्हिटी घेतल्या. शाखेच्या कार्यकर्त्यांनी जेंडर फेअर घेतले. रात्री गेम, कॅम्प फायरची मजा अनुभवली. धम्माल, मस्ती, साहस, विचार घेत हे शिबिर उत्साहात पार पडले.

**विज्ञान बोधवाहिनी उपक्रम:**

नवी मुंबई जिल्ह्यातर्फे विज्ञान बोधवाहिनी उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना फिरते 3D नभांगण दाखवण्यात आले. सदर कार्यक्रम गुरुवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी पार पडला. वाशी, सेक्टर १०, मधील, अंजुमन - ई - इस्लाम ए. ए. के. इंग्रजी विद्यालयात सकाळी ०८.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत हा कार्यक्रम पार पडला. विद्यार्थ्यांना डोमच्या अर्धगोलात वरील छतावर ग्रह, तारे, सूर्यमाला, आकाशगंगा यांची निर्मिती व लय लघुपटाद्वारे दाखवण्यात आला. सूर्यमालेतील ग्रहांचा आकार व वस्तुमान यांची माहिती तसेच सूर्यापासूनचे विविध ग्रहांचे अंतर व त्यांच्या भ्रमणकक्षा यांची माहिती लघुपटाद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात आली. ३६० विद्यार्थ्यांना नभांगण दाखवण्यात आले.

सदर कार्यक्रमाला अंजुमन - ई - इस्लाम संस्थेचे विश्वस्त मा. इक्बाल कवारे, शाळेच्या मुख्याध्यापिका जुलेखा मॅडम तसेच माजी आयकर आयुक्त मा. अरविंद सोनटक्के उपस्थित होते. महा. अंनिसचे गजानंद जाधव, उत्तम रोकडे व अशोक निकम यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

**शिंदखेडा येथे साजरा झाला विद्यार्थी विज्ञान महोत्सव**

२४ फेब्रुवारी रोजी पतसंस्थेच्या शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर सभागृहात कार्यशाळा घेण्यात आली. ६० विद्यार्थी व १० शिक्षक उपस्थित होते. त्यांना ४ विज्ञान गाणी, १० चमत्कार, २ बालविज्ञान नाटिका शिकविण्यात आले. 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर मार्गदर्शन केले.

उद्घाटन तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी डॉ. सी. के. पाटील यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. दिलिप लोखंडे, शाखाअध्यक्ष मनोहर भोजवानी उपस्थित होते. भिका पाटील, प्रा.संदीप गिरासे, प्रा. परेश शाह, तृप्ती गिरासे, देवेंद्र नाईक, कल्पेश सोनवणे यांनी प्रशिक्षण दिले.

**वारसा संतांचा, अंधश्रद्धा निर्मूलनाचा अभियान:**

**निमगुळ (धुळे) :** न्यू इंग्लिश स्कूल निमगुळ येथे संत गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली. 'वारसा संताचा अंधश्रद्धा निर्मूलनाचा' याविषयी गाडगे महाराज

यांचे विचार म. अंनिसचे जिल्हा पदाधिकारी दिलीप खीवसरा यांनी सांगितले, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भास्कर सूर्यवंशी, एस.व्ही. भदाने, आर. सी. वाघ, एम. एम. देसले सर व विद्यार्थी उपस्थित होते

**औरंगाबाद :** या महा. अंनिस अभियानांतर्गत लासूर स्टेशन शाखेच्या वतीने हनुमान मंदिरात ११ संत व त्यांनी रचलेले अभंग यांच्यासह पोस्टर प्रदर्शन व चमत्कार सादर करण्यात आले. कार्यक्रम संपल्यानंतर थांबलेल्या लोकांसमवेतचे काही क्षण. सादरकर्ते : बी. टी. बोरसे गुरुजी व भाऊ पठाडे, सहभाग : डॉ. विकास सगेकर, बाबासाहेब हरकळ, निकम नाना, विठ्ठलराव चव्हाण आण्णा, बनगे साहेब, वामनराव शेजवळ, आर.बी. नरोडे सर, किसनराव चदिले सर, सुधाकर अभंग सर, गौतम गवई, सुरेश गावंडे सर, श्रीहरी शेलार साहेब.

दिनांक २/३/२०२३ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती संचलित छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाचपीरवाडी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद येथे इयत्ता ८वी आणि ९वी च्या वर्गासाठी संतवाणी लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या पाठ्यपुस्तकात असलेले अभंग, संतवाणी लिहून त्यांना समजलेला अर्थ लिहिण्याची ही स्पर्धा होती. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात या स्पर्धेत सहभाग नोंदवला. संतांचे महात्म्य, संतांनी केलेला उपदेश आजच्या काळातही किती महत्त्वाचा आहे, अशी काही प्रश्नोत्तरे विचारून तसेच संतांनी अंधश्रद्धा कशा दूर करण्याचा प्रयत्न केला असेल, तो काळ कसा असेल याबाबत अगदी हसत-खेळत चर्चा दीक्षा काळे यांनी विद्यार्थ्यांसोबत केली. संत गाडगेबाबा, संत बहिणाबाई, संत तुकाराम, संत नामदेव यांच्याबाबत मुलांना थोडक्यात माहिती दिली गेली.

**चंद्रपूर :** ऊर्जानगर येथील कामगार मनोरंजन केंद्रात जिल्हा कार्याध्यक्ष पी. एम. जाधव यांचे प्रमुख उपस्थितीत वारसा संतांचा, अंधश्रद्धा निर्मूलनाचा या राज्यव्यापी अभियानांतर्गत पोस्टर्स प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी ऊर्जानगर शाखेचे पदाधिकारी, सदस्य विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**राष्ट्रीय विज्ञान दिन:**

**निमगुळ :** राष्ट्रीय विज्ञान दिन निमगुळ, तालुका धुळे येथील कष्टकरी महिलांनी केली जनजागृती. २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिन आहे, आपल्या देशात अलौकिक दैवी सामर्थ्य लाभल्यामुळे चमत्कार करून दाखवणारे शेकडो बुवा, महाराज, मांत्रिक आहेत. खरं पाहाता, त्यांचे हे चमत्कार जर तपासून पाहिले तर चलाखीचे हात, छुप्या शारीरिक क्षमतेचे किंवा साधे विज्ञानाचे प्रयोग असतात, आता फसायचं की नाही ते तुम्ही ठरवायचं. आमचे चमत्कार तपासायचं आणि त्यांना आव्हान देण्याचा आत्मविश्वास तुमच्यामध्ये निर्माण होईल तेव्हा आपण करा राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला असं समजू, अशी माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा पदाधिकारी दिलीप खिवसरा यांनी महिलांना राष्ट्रीय विज्ञान दिनाबद्दल सांगितले. यावेळी गोपाबाई मराठे, कल्पनाबाई मोरे, प्रमिलाबाई मराठे, अंबिकाबाई पाटील, सरलाबाई नागोडे, पुष्पाबाई खैरनार, सुशीलाबाई मराठे, सरुबाई महाजन, आशाबाई शिंपी आधी महिला उपस्थित होत्या.

**कोल्हापूर :** २८ फेब्रुवारी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' महा.अंनिसच्या वतीने विज्ञान महोत्सवांतर्गत अनेक शाळांमध्ये विविध उपक्रमांच्या माध्यमातून विज्ञान दिन जिल्हाभर साजरा करण्यात आला.

शिरोळ शाखेच्या वतीने जिल्हा परिषदेच्या विज्ञान महोत्सवाअंतर्गत तालुक्यातील जिल्हा परिषद परिषदेच्या दहा शाळांमध्ये विविध उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल चार शाळांना पारितोषिक देण्यात आले. यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे वैज्ञानिक जाणीव शिक्षणप्रकल्पाचे जिल्हा कार्यवाह विनायक सुनिता अशोक यांनी विशेष प्रयत्न केले.

शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, कोते, ता. राधानगरी येथे राष्ट्रीय विज्ञान दिन आणि १० वी विद्यार्थ्यांच्या सदिच्छा समारंभामध्ये 'अंधश्रद्धा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर रेश्मा खाडे यांनी मांडणी केली. त्याबरोबर राहुल सुतार यांनी चमत्काराचे प्रयोग घेऊन विद्यार्थ्यांची उत्सुकता वाढवली. शेवटी प्रश्नोत्तराच्या सेशनमध्ये विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद

दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक दराडे सर होते. कार्यक्रमाची प्रस्तावना पोवार सरांनी केली, तर समारोपाचे आभार गुरव सरांनी केले.

**पुणे जिल्हा :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त एकूण ८ कार्यक्रम आयोजित कण्यात आले. खेळघर येथे दोन, मॉडर्न स्कूल कर्वेनगर, महात्मा फुले हायस्कूल, वारजे, पिंपरी सायन्स पार्क येथे दोन, चाकण येथे एन.एस.एस., चिंचोली येथे एक. कार्यकर्ते दिगंबर कट्यारे, विशाल विमल, मनिषा महाजन, क्रांती पोतदार, अतुल सवाखंडे, माधुरी गायकवाड, स्वप्नील भोसले यांनी चमत्कार सादरीकरण केले.

**नवी मुंबई जिल्हा :** नवी मुंबई जिल्ह्यातर्फे २८ फेब्रुवारी, राष्ट्रीय विज्ञान दिन निमित्ताने विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना विविध चमत्काराची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली व त्या मागील विज्ञान उलगडून दाखविले. विज्ञानाच्याआडून भोंदूबाबा बुवा चमत्काराचे दावे करून जनतेला फसवतात. 'आपण विज्ञान जाणून घेऊन अशी बुवाबाजी नष्ट करूया', असा संदेश देण्यात आला. महा. अंनिसचे कार्यकर्ते अशोक निकम यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक मा. गवळी सर व समस्त शिक्षकवृंद उपस्थित होते. सदर कार्यक्रमात २०० विद्यार्थी सहभागी होते.

**गडचिरोली :** संजीवनी प्राथमिक तथा माध्यमिक विद्यालय, नवेगाव येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री. देवाजी सोनटक्के, प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. खोब्रागडे कृषी महाविद्यालय गडचिरोली, महा. अंनिसचे



वैज्ञानिक जाणिवा शिक्षणप्रकल्पचे राज्य सहकार्यवाह श्री. विलास निंबोरकर, शाळेचे मुख्याध्यापक श्री. भैसारे सर उपस्थित होते. संचालन श्री. वेणुगोपाल ठाकरे सहा. शिक्षक तर आभारप्रदर्शन श्री. प्रवीण एडलावार यांनी केले. श्री. विलास निंबोरकर यांनी चमत्कारावर आधारित प्रात्यक्षिके सादर करून त्यामागील कार्यकारणभाव समजावून सांगितले.

**यवतमाळ :** २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त 'विज्ञान प्रयोग व भोंदुची हातचलाखी' हा कार्यक्रम आदिवासी आश्रमशाळा अंतरगाव, ता. कळंब, जि. यवतमाळ घेण्यात आला.

मार्गदर्शक – रुपेश वानखडे (राज्य युवा सहकार्यवाह महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती), कार्यक्रमाचे अध्यक्ष – विजय क्षीरसागर (मुख्याध्यापक), उपस्थिती–रूपेंद्र लोखंडे (शिक्षक), अश्विनी वानखडे (समतादूत)

एकूण उपस्थित संख्या २५० होती.

**लातूर :** दि.२८ फेब्रुवारी २०२३ रोजी संत ज्ञानेश्वर विद्यालय, अहमदपूर, जि. लातूर येथे विज्ञान दिनानिमित्त चमत्कार सादरीकरण करून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांचे यांचे सहकार्य लाभले.

**अमरावती :** शाखा तसेच मराठी विज्ञान परिषद अमरावती विभाग आणि विनायक विज्ञान महाविद्यालय नांदगाव खंडेश्वर यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून दुर्बिणीद्वारे आकाश निरीक्षण तसेच सहल अंतराळाची हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी विज्ञान जाणिवा विभाग प्रमुख प्रवीण गुल्हाने यांनी विद्यार्थ्यांना खगोलशास्त्रविषयक माहिती दिली, तर सुशीलदत्त बागडे यांनी दुर्बिणीतून विद्यार्थी व गावकऱ्यांना आकाशदर्शन करवले. श्री. विजय गिरुळकर यांनी सहल अंतराळाची हा सदी व्याख्यानाचा कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाला सुमारे ११५ विद्यार्थी व गावकरी तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.

**'लव्ह आझाद' वर मुक्तचर्चा** : शाखा पनवेलतर्फे व्हॅलेंटाईन वीकनिमित्त व जोडीदाराची विवेकी निवड राज्यव्यापी युवा संकल्प अभियानाअंतर्गत 'लव्ह आझाद' वर १२ फेब्रुवारी रोजी खुली चर्चा आयोजित करण्यात आली होती. चर्चेला दिशा देण्यासाठी यामध्ये आरती

नाईक, प्रशांत ननावरे व गायत्री लेले यांचे पॅनेल नेमण्यात आले होते. प्रेम म्हणजे काय? डिसऑनर किलिंग, लव्ह जिहाद, एकतर्फी प्रेम इत्यादी विषयांवर उपस्थितांनी मुक्तचर्चा केली. प्रेमावर जात, धर्म, संस्कृती यांचं नियंत्रण नको. प्रेम हे नैसर्गिक आहे आणि प्रत्येकाचे निर्णयस्वातंत्र्य मान्य असायला हवे, असा एकूण सर्वांचा सूर होता. लव्ह जिहाद हे धर्मद्वेष निर्माण करणारं आणि स्त्रियांचं निवडीचं स्वातंत्र्य नाकारणारं षड्यंत्र आहे, असेही उपस्थितांचे मत पडले.

**नशामुक्ती व अंधश्रद्धा मुक्तीने शिवरायांना अभिवादन**

**नागपूर :** कळमेश्वर तालुक्यातील मांडवी येथे शिवस्वराज्य मित्रमंडळाच्यावतीने महाराष्ट्र अंधश्रद्धा अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा 'अंधश्रद्धेची दुनिया व चमत्काराची किमया'; तसेच नशाबंदी मंडळाचा 'आजची युवा पिढी आणि व्यसनाधिनता' या विषयाला अनुसरून प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी अशोक खोरगडे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची ओळख करून दिली, तर जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी तेल-वातीविना पाण्याने चमत्कारिक पद्धतीने दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. याबरोबरच लागोपाठ वैज्ञानिक चमत्काराचे सादरीकरण करून उपस्थित प्रेक्षकांना छत्रपती शिवराय कधीही मुहूर्त बघून योजना आखत नव्हते. शुभ-अशुभ कल्पनांना मानत नव्हते म्हणून ते बहुतेक अमावस्येच्या रात्रीची वेळ पाहून शत्रूवर स्वाऱ्या करायचे आणि गडकिल्ले जिंकायचे.

यावेळी मंचावर महाराष्ट्र अंनिसचे कोराडी शाखा कार्याध्यक्ष ताराचंद पखिड्डे, सावनेर शाखा कार्याध्यक्ष अनिलजी घटे, महिला कार्यकर्त्या मुक्ता सोनेकर, सरपंच शरद जुनघरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता मनीष आंबुलकर, निखिल ठोंबरे, उमेश पावडे, प्राची बेले, पल्लवी बेले, अतुल ढोके, आशिष ठोपरे, मयूर वाढी, लोकेश अंबुलकर, प्रज्वल वाढी, संकेत पावडे या युवकांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय ठोंबरे यांनी केले, तर आभार संकेत पावडे यांनी मानले.

**पर्यावरणपूरक होळी अभियान :**

**वर्धा :** वर्धा जिल्हा व शहर शाखेच्यावतीने गेली २० वर्षांपासून 'होळी लहान करा; पुरण पोळी दान करा' हा पर्यावरणपूरक कार्यक्रम राबविण्यात येतो. याही वर्षी गिरी पेठ, तडस लेआऊट, अंजनामाता, स्वागत कॉलनी, गिताई नगर आदी परिसरातील जळणारी होळी व जळत्या होळीत टाकल्या जाणाऱ्या पुरणपोळी, गाठ्या जमा करून महाअंनिसचे कार्यकर्ते गजेंद्र सुरकार, अनिल मुरडीव, राजेंद्र ढोबळे, इंजि.देविदास पावडे, अरूण चवडे, सारिका डेहनकर, प्रितेश म्हैसकर, निखिल जवादे, सुनिल ढाले, रजनी सुरकार, डॉ.माधुरी झाडे, संजय आत्राम, विलास भगत, प्रकाश कांबळे, विजय कडू, भरत कोकावार, राजेश डेहनकर, सुश्री आत्राम आदींनी रेल्वे स्टेशन बस स्टॅण्ड बजाज चौकातील फुटपाथवर रंग, पिचकारी विकणारे विक्रेते आदींना वाटप करण्यात आले.

**लातूर :** शाखेच्यावतीने पर्यावरणपूरक होळी साजरी करण्यात आली. यावेळी विविध दुर्गुणांची होळी करावी, अशा आशयाचे पोस्टर अंनिसच्या पदाधिकारी यांनी हातात धरून सामाजिक प्रबोधन केले. यावेळी राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्य सरचिटणीस रुक्सना मुल्ला, राज्य पदाधिकारी उत्तरेश्वर बिराजदार, जिल्हा कार्याध्यक्ष अनिल दरेकर, जिल्हा प्रधानसचिव सुधीर भोसले, जिल्हा कार्यवाह रणजित आचार्य, शहर कार्याध्यक्ष प्रा. दशरथ भिसे, प्रधानसचिव सचिन औरंगे आदी उपस्थित होते.

**निमगुळ :** येथील महिलांनी दुर्गुणांची होळी केली. आजपासून आपण आपल्यातील किंवा आपल्या परिवारातील किंवा समाजातील व्यक्तींनी जे जे दुर्गुण असतील ते होळीमध्ये टाकून व्यसनमुक्त समाज निर्माण करण्याचा प्रयत्न किंवा संकल्प करूया असा संदेश महिलांनी दिला, असे अरुणाबाई मराठे, सरुबाई महाजन, कल्पनाबाई मोरे, सरुबाई नागोडे, पुष्पाबाई खैरनार,



गोपाबाई मराठे, ललिताबाई मराठे, आशाबाई शिंपी, प्रमिलाबाई मराठे, रूपाबाई महाजन, कविताबाई मराठे, सुशिलाबाई मोरे, कलाबाई खैरनार, जनाबाई मराठे, कविताबाई महाजन, अलकाबाई मराठे आदी महिला उपस्थित होत्या.

**गडचिरोली :** महा. अंनिसचे कार्यकर्ते दरवर्षी आपल्या समविचारी संघटनांना सोबत घेऊन पुरणपोळी होळीमध्ये न जाळता गरजू लोकांच्या मुखात जाण्यासाठी गडचिरोली शहरातील चामोर्शी मार्गावरील मातोश्री वृद्धाश्रम येथे वृद्ध बांधवांना होळीनिमित्त महा. अंनिस व समविचारी संघटनांचे कार्यकर्ते घरी जे काही पक्वान्न शिजवतात ते त्यांच्यापर्यंत पोहचवून खऱ्या अर्थाने होळी सणाचा सन्मान करतात. अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष डॉ.शिवनाथ कुंभारे यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अखिल भारतीय गुरुदेव सेवामंडळ व सायकल स्नेही मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे, असे सांगून सर्वांना होळीच्या व रंगपंचमीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी मा. पंडित पुडके, विलास निंबोरकर, पुरुषोत्तम ठाकरे, विठ्ठलराव कोठारे, प्रा. विलास पारखी, प्रा. भास्कर नरूले, दामोधर ऊप्परवार, उपेंद्र रोहनकर, हरिदास कोटरंगे, आदिती ऊप्परवार, अरविंद राजगडे, वासुदेव कोठारे, शंकर कोठारे, सौ.वर्षा राजगडे, कु.अवनी राजगडे आदी उपस्थित होते.

**पालघर :** शिरगाव, पालघर येथे यावर्षी 'अंधश्रद्धा' या विषयावरती देखावा साकारला गेला. या देखाव्यासाठी महा.अंनिस पालघर शाखेचे बहुमोल यांचे सहकार्य लाभले. भव्य अशा मानवी खोपडीद्वारे सांगण्यात आले की, भूत कुठेच नसतं या जगात, असतं ते अज्ञानी माणसाच्या डोक्यात. दरवाजाला लावलेली चप्पल, काळी बाहुली, घोड्याची नाल आणि लिंबू-मिरची या अंधश्रद्धा आहेत आणि त्यावर स्लोगन लिहिले होते, 'पदार्थ आहेत लिंबू आणि मिरची, सुरक्षा नाही करत ते गाडी' आणि घराची काळी मांजर आडवी जाणे ही अंधश्रद्धा आहे हे दर्शविणाऱ्या चित्राखाली लिहिले होते, 'मांजर जाईल तिच्या स्थितीत, तुम्ही जगू नका तिच्या भीतीत.' या संपूर्ण देखाव्याद्वारे मंडळाला म्हणायचे होते की, 'सोडा अंधश्रद्धेचा ध्यास, नाही तर होईल जीवनाचा ऱ्हास.'

**कोल्हापूर :** महा.अंनिस व विवेक वाहिनी, अंतर्गत 'होळी लहान, पोळी दान' हा उपक्रम देवचंद शहा, छात्रालय, कागल येथे आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमासाठी काल होळीमध्ये पोळ्या न टाकता त्या जमा करून, अनाथालय व ऊस तोडणी कामगार यांच्या मुलांना खाऊ घालण्यात आल्या. यावेळी या उपक्रमामध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कागलसह डी. आर. माने एन.सी.सी. विभाग, महाराष्ट्र विवेक वाहिनी विभाग, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी संघ पदाधिकारी सहभागी झाले होते. यावेळी ५०० हून अधिक पोळ्या जमा झालेल्या होत्या. या कार्यक्रमामध्ये डी. आर. माने महाविद्यालय, कागलमधील प्रा.आबासाहेब चौगले सर, प्रा.डॉ.संतोष जेठीथोर सर, प्रा. कल्पना गुरव मॅडम, प्रा.डॉ.लखन भोगम सर, प्रा.मयूर गौड सर, प्रा. रोहित नाईक सर व कागल अंनिसचे हरी आवळे, विक्रम चव्हाण, अंशुमन कांबळे, अभी शिंदे, हेमंत बन्ने, शुभम सोनुले, चेतन हेगाजे उपस्थित होते.

**अलिबाग :** शाखेतर्फे 'होळी लहान करा, पोळी दान करा' असे आवाहन करण्यात आले व पोळ्या व शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.



**हुपरी :** शाखेतर्फे परिसरातील जो कचरा आहे तो गोळा केला आणि त्याची होळी केली. एका नव्या परिवर्तनाची सुरुवात केली. पुरुषप्रधान असणाऱ्या संस्कृतीला छेद देत होळीचे दहन आणि नारळ वाढवण्याचे काम आजही पुरुष करतात. त्याला फाटा देत महिलांच्या हस्ते होळीचे दहन आणि नारळ वाढवण्याचे कार्य करण्यात आले. या उपक्रमात युवा परिवर्तन सामाजिक संघटना, रेंदाळ शहर, योगेश कांबळे, अमोल कांबळे, राहुल कांबळे, लखन रेंदाळकर, अनिल शिंगे, शिवाजी कांबळे, संतोष कांबळे, साहिल शिंगे, राहुल मोहिते, वामन कांबळे, सिद्धेश



कांबळे, रेंदाळ ग्रामपंचायत सदस्या अनिता शिंगे, रेंदाळ ग्रामपंचायत सदस्या जनाबाई उर्फ स्वाती सादळे.

**नवी मुंबई :** उलवे शाखेतर्फे 'होळी करा लहान, पोळी करा दान' उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. सोमवार, दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी उलवे येथील उन्नती को.ऑप. हौ. सोसायटीतील होळी समारंभात महा. अंनिसचे कार्यकर्ते पांडुरंग सरोदे यांनी, 'नैवद्याची पोळी होळीत अर्पण करून पोळीची राख न करता आम्हाला द्या, आम्ही त्या पोळ्या गरजू लोकांना नेऊन देऊ'. या आवाहनाला भरभरून प्रतिसाद मिळाला. ३६० पोळ्या दान मिळाल्या. सदर पोळ्या उलव्यातील गरीब वस्तीत नेऊन दिल्या. आपली परंपरा जपताना त्याला माणुसकीची जोड दिली. आपला विवेक जागृत ठेवून समाजातील परंपरांना मानवतेशी जोडूया. उपक्रम यशस्वी करण्यासाठी दिव्या सरोदे, वंदना सरोदे, हेमा देशपांडे, प्रेम सरोदे, अनिलकुमार देशपांडे, ऋषिकेश वाघमारे, विजय साबळे व कृष्णा सावळे यांनी सक्रिय सहभाग घेतला. महिला कार्यकर्त्या मीनाक्षी शिंगे, सृष्टी कांबळे, सुनिता वडर, अश्विनी कांबळे, सारिका कांबळे, साक्षी कांबळे, नंदिनी नागावकर, विद्या तामगावकर, सुनीता वाघमारे आदी सहभागी झाले.

**नागपूर :** कोराडी रोड परिसरामध्ये शाखा दरवर्षीप्रमाणे पर्यावरणपूरक होळी अभियानाअंतर्गत 'होळीची पोळी करू दान, बाळगू विवेकाचे भान' असे आवाहन नागरिकांना केले होते. या आवाहनात्मक हाकेला कोराडी विद्युत विहार परिसरातील होळी उत्सव मंडळांच्या महिला कार्यकर्त्यांनी उत्तम प्रतिसाद देत, होळीमधील नैवेद्याच्या स्वरूपात नष्ट होणाऱ्या पुरणपोळ्या, गाठी, नारळ तसेच पूजेच्या ताटातील अन्य खाद्यपदार्थ वाचविले. पुरणपोळ्यांच्या संकलनाचे काम रात्री सात ते दहा वाजेपर्यंत प्रत्येक होळीजवळ जाऊन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी सहकारी साथी शाखा अध्यक्ष ताराचंद पखिड्डे, शाखा कार्याध्यक्ष बबन गायकवाड, प्रधानसचिव विलास भालेराव, बाळकृष्ण झाडोकार, राजू साळवे यांना सोबत घेऊन केले. दुसऱ्या दिवशी सकाळी या संकलित झालेल्या पुरणपोळ्या गोधनी येथील साधना लंगर सेवासंस्थेच्या अध्यक्षा मानसी भांदक्कर व आसमान फाऊंडेशनचे अध्यक्ष रवी गिऱ्हे यांच्या माध्यमातून विल्किन्सन विद्यालयातील अनाथ भुकेल्या विद्यार्थ्यांना एकवेळच्या भोजनाच्या रूपाने दिल्या.

याप्रसंगी पोळ्या संकलनाच्या कार्यामध्ये डॉ. कविता मते, संगीता आळणे, स्वाती पटले, अरुणा देशमुख, सोनाली वानखेडे, पूजा दरेकर, भूमिका ताजने, सीमा गावनेर, तनु मारबते, संगीता पट्टे, प्रीती निर, उज्वला गंदे, अत्राम ताई, मेघा मुंडे, स्नेहल लोंढे, मीरा कांबळे, सोमेश कडबे, अंकुश गवई, अनिल बोरकर, विठ्ठल मते इत्यादींनी पुरणपोळ्या व खाद्यपदार्थ होळीत न टाकता अंनिस कार्यकर्त्यांना संकलित करून दिल्या.

**जेंडर फेअर :** जागतिक महिला दिन व महिला सभासद नोंदणी अभियाना पनवेल शाखेने ५ मार्च रोजी जेंडर फेअरचे आयोजन केले होते. या फेअरचे उद्घाटन, पनवेलमध्ये सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अर्चना परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावर्षीच्या 'डिजीट ऑल' या थीमनुसार स्त्रीचा पारंपरिक रोल बदलत नवीन तिच्या हाती आधुनिकता, मुक्तता देत अभिनव पद्धतीने उद्घाटन झाले. मेकॅनिकल, इलेक्ट्रिक, डिजीट ऑल, कॉम्प्युटर, शिवणकाम, खेळणी, स्वयंपाक, गॅस जोडणे, गाडी स्टँडला लावणे, हवा भरणे अशा जेंडरवर आधारित गोष्टींचे स्टॉल लावून प्रत्यक्ष कृतीतून त्यातील जेंडर दूर करण्याचा हा प्रयत्न होता. दिवसभर या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे जेंडर विभागणीतील सर्व समूहांची याला उपस्थिती होती. यानिमित्ताने, राज्यभर सुरू असणाऱ्या महिला सभासद नोंदणी अभियानाला उत्तम प्रतिसाद मिळून चांगली नोंदणी झाली. ऑनलाईन नोंदणी फॉर्मचे उद्घाटनही प्रमुख पाहुण्या अर्चना ठाकूर यांचा फॉर्म भरून करण्यात आले.

•

# वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पाचे महाराष्ट्रभर कार्यक्रम

प्रा. दिगंबर कट्यारे, जळगाव
९८६०३११३२२

राष्ट्रीय विज्ञान दिन नियोजनपूर्वक आणि परिणामकारक पद्धतीने साजरा करण्यासाठी महा. अंनिसच्या वैज्ञानिक जाणिवा शिक्षणप्रकल्प विभागामार्फत फेब्रुवारी महिन्यात दोन बैठका घेतल्या गेल्या. या बैठकांमध्ये सर्व पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्याविषयी सविस्तर चर्चा केली आणि व्यवस्थित करण्याचे ठरले आणि त्यानुसार विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**चमत्कार सादरीकरण कार्यक्रम**

राज्यस्तरावर एक छोटीशी आणि अभिनव कल्पना म्हणून किमान पाच प्रयोग आणि राष्ट्रीय विज्ञान दिनाची माहिती लिहून ते प्रयोग कसे करावेत, सादरीकरण कसे असावे, याविषयी माहिती लिहून पाठवली. हा उपक्रम अमलात आणण्यासाठी एकूण सहा विद्यार्थी आणि एक शिक्षक यांचा समावेश असावा, शिक्षकाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे आणि राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दिनांक २८ फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यांनी आपल्या विद्यालयात कार्यक्रम सादर करावेत, असे नियोजन करण्यात आले.

सांगायला विशेष आनंद होत आहे की, यंदा शहादा व नंदुरबार शाखांनी तर हा उपक्रम राबविलाच; शिवाय महाराष्ट्र स्तरावर अनेक ठिकाणी विभागाने पाठविलेला हा पाच प्रयोगांचा उपक्रम राबविला आहे. हा उपक्रम राबवणारे जिल्हे आणि त्यांनी केलेल्या कार्यक्रमांची संख्या (कंसात) पुढीलप्रमाणे : जळगाव (९), धुळे (२), पुणे (८), कोल्हापूर (११), वर्धा (३), नाशिक (२), नागपूर जिल्हा (३) कोकण विभागतील नवी मुंबई (९), मराठवाड्यातील उस्मानाबाद, नांदेड, औरंगाबाद, लातूर, परभणी जिल्ह्यांतील काही भागात; तसेच विदर्भात भंडारा, अमरावती, गोंदिया, अकोला जिल्ह्यात एक एक कार्यक्रम सादर करण्यात आले. या कार्यक्रमांना उत्तम प्रतिसाद मिळाला. विज्ञान सर्वत्र पूज्यते हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहचला. अशा प्रकारे, या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राच्या पंचवीस जिल्ह्यांत कार्यक्रम घेण्यात आले. त्यातूनच वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे कार्यकारणभाव ही संकल्पना विद्यार्थ्यांकडून वदवून घेण्यात आली.

**नंदुरबार पॅटर्न**

शहादा, शिंदखेडा, नंदुरबार येथील शाखांच्या कार्यकर्त्यांनी शिंदखेडा येथे अनेक विद्यालयांतील विद्यार्थी व शिक्षक यांची 'विद्यार्थी विज्ञान महोत्सव' अंतर्गत कार्यशाळा घेण्यात आली. रविंद्र पाटील, वसंत वळवी, कीर्तीवर्धन तायडे, विनायक सावळे यांनी विशेष परिश्रम घेवून विद्यार्थ्यांना व शिक्षकांना प्रशिक्षण दिले. त्यानुसार ४१ ठिकाणी विद्यार्थ्यांनी आपल्या विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला. सुमारे तीस हजार विद्यार्थ्यांपर्यंत हा उपक्रम पोहोचला. महाराष्ट्र राज्यस्तरावर वैज्ञानिक जाणिवा शिक्षणप्रकल्प विभागामार्फत एकूण सुमारे १०० ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आले. त्याद्वारे सुमारे एक लाख विद्यार्थ्यांपर्यंत आपण वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे कार्यकारणभाव ही संकल्पना पोहोचवली.

**विज्ञान प्रश्नावली**

महा. अंनिसच्या वैज्ञानिक जाणिवा शिक्षणप्रकल्प विभागामार्फत वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी त्या विषयावर विज्ञान प्रश्नावली तयार करून ऑनलाइन गुगल फॉर्म भरून ती सोडवण्यासाठी ग्रुपवर टाकून कार्यकर्ते व नागरिक यांनी त्या प्रश्नांची उत्तरे सोडवायची अशी संकल्पना अमलात आणली. प्रश्नावली सोडवल्यावर सहभागी लोकांना इ-प्रमाणपत्र मिळाले. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. सुमारे दोनशेहून अधिक लोकांनी यात सहभाग नोंदविला.

विभागामार्फत वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी चमत्कार सादरीकरण केले जातात. कार्यकर्ते अतिशय योग्य पद्धतीने आपली मांडणी करीत असतात म्हणून विभागामार्फत व्याख्यान आयोजित करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

**कार्यक्रमाची वैशिष्ट्ये**

**ऑनलाईन व्याख्यान :** राज्य सरचिटणीस विनायक सावळे यांनी गुगलमीटवर 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर व्याख्यान दिले.

- अमरावती येथे खगोलीय वैज्ञानिक घटना जाणून घेण्यासाठी सहल आयोजित करण्यात आली.

- नांदेड येथे हरिदास तम्मेवार यांनी ‘संतसाहित्य आणि समाज प्रबोधन’ या विषयावर व्याख्यान दिले.
- ‘चमत्कार आणि विज्ञान जुगलबंदी’ अशी एक नवीन संकल्पना पुणे येथे सादर करण्यात आली.
- नवेगाव येथे विलास निंभोरकर यांनी गरोदर माता व बालक यांची आरोग्य तपासणी कार्यक्रम केला.
- कृष्णात कोरे यांनी अंधशाळेतील विद्यार्थ्यांना ब्रेल लिपीत विज्ञान माहिती देणारा कार्यक्रम कोल्हापूर शाखेमार्फत आयोजित केला.
- राष्ट्रीय सेवा योजनामध्ये कार्यक्रम सादर करण्यात आला.
- आकुर्डी व शिवाजी नगर शाखेमार्फत सायन्स पार्क पिंपरी येथे मराठी विज्ञान परिषद, पुणे विभागासोबत कार्यक्रम आयोजित केला.

**प्रसिद्धी**

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त अध्यक्ष अविनाशभाई पाटील यांचा लेख प्रसिद्ध करण्यात आला. काही स्थानिक पातळीवर बातम्या, लेख देखील प्रसिद्ध झालेत. पूर्ण महाराष्ट्र हा दिन विज्ञानमय झाल्याचे चित्र यावेळी दिसून आले.

(लेखक महा.अंनिसच्या वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पाचे राज्य कार्यवाह आहेत.)

●

**(पृष्ठ क्रमांक २८ वरून )**

पूर्ण होणे अपेक्षित असताना दोन महिने उलटूनही अजून निम्म्यापेक्षा अधिक शाखा कार्यकारिणी मध्यवर्तीला प्राप्त होणे बाकी आहे. हा संघटनात्मक ढिसाळपणा संघटनेला परवडणारा नाही. त्यामुळे संघटनात्मक आणि स्वयंशिस्त ही सर्वांकडून अपेक्षित आहे. येत्या काळात ही गॅप भरून काढू या. निराश न होता अधिक क्रियाशील होवू या.

यावर्षी महिला सहभाग विभागाच्या वतीने संघटनेत युवती व महिलांचा सहभाग वाढावा, यासाठी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिला सभासद नोंदणी विशेष अभियान राबवले जात आहे. त्याला खूप चांगला प्रतिसाद सर्व शाखा पातळीवर मिळाला आहे. सर्वांनी त्यासाठी वेळ देवून दिलेल्या साहित्यासह सार्वजनिक ठिकाणी स्टॉल मांडून, सोशल मीडियात पद्धतशीरपणे प्रसिद्धी देऊन सभासद नोंदणी करून घेतली आणि निर्धारित एक हजार सदस्य नोंदणीचे लक्ष्य ओलांडले आहे, हे सांगताना मला अत्यंत आनंद होत आहे. आपले आणि महिला सहभाग विभागाचे याबद्दल विशेष अभिनंदन. याचे अतिशय चांगले परिणाम यापुढे दिसून येणार आहेत.

साथी यावर्षी २०२३ ते २०२५ या कालावधीसाठी जिल्हा कार्यकारिणी निवडप्रक्रिया आपणास मार्च आणि एप्रिलमध्ये पूर्ण करावयाची आहे. ती कोणत्याही परिस्थितीत वेळेत पूर्ण करू या. आपण पनवेलच्या राज्य कार्यकारिणीमध्ये जिल्हा प्रेरणा मेळाव्याच्या तारखा दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे आपणास वर्षभराचे संघटनात्मक कामाचे कॅलेंडर दिलेले आहे. त्यात पुढील चार महिन्यांचे कॅलेंडर पुन्हा पाठवले आहे. त्याप्रमाणे त्या त्या वेळी ते पूर्ण करणे गरजेचे आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित राज्य, जिल्हा शाखा पदाधिकाऱ्यांची आहे, हे विसरून चालणार नाही. मे महिन्यात राज्य व जिल्हा पदाधिकारी यांचे प्रशिक्षणही आयोजित केले आहे. त्या प्रशिक्षणाच्या तारखा फार अगोदर दिल्या आहेत. त्या आपण राखून ठेवल्या असतीलच. यावेळी १००% उपस्थिती अपेक्षित आहे.

जिल्हा निवड प्रक्रियेची विचार कृतिपत्रिका विनायक सावळे यांनी अगदी बारकाव्यानिशी तयार केलेली आहे, ती आपण पूर्ण वाचून घ्यावी. त्याप्रमाणे काटेकोरपणे निवडप्रक्रिया राबवावी. निवड प्रक्रिया व्यवस्थित नाही झाली तर त्याचे परिणाम पुढील दोन वर्ष दिसणार आहेत. म्हणून पदासाठी द्यावा लागणारा वेळ, द्यावे लागणारे दिवस, पदाच्या जबाबदाऱ्या या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून निवड प्रक्रिया पार पाडावी. याची सर्वस्वी जबाबदारी शाखा, जिल्हा व राज्य निरीक्षक यांची आहे. आपण सर्वजण कर्तव्यभावनेतून विचारपूर्वक जिल्हा निवड प्रक्रिया राबवाल, अशी अपेक्षा करतो. यातून सशक्त सर्वार्थाने मजबूत संघटन उभे करूया आणि इतर सर्व समविचारींसमक्ष आपला एक वेगळा आदर्श निर्माण करू या. विवेकाचा आवाज बुलंद करू या.


●


# गणितप्रेमी


सूरज उर्मिला सुनील

१,१,२,३,५,८,१३... ही Fibonacci sequence (फिबोनाकी सिक्केन्स) नावाची एक विशेष श्रेणी आहे. आपले जग सुंदर बनवण्यामध्ये या श्रेणीला खूप श्रेय जाते. कसे? चला बघूया.

या श्रेणीतील प्रत्येक संख्या आधीच्या दोन संख्यांच्या बेरजेपासून बनते. १+१=२, १+२=३, २+३=५, ३+५=८, ५+८=१३. अशा पद्धतीने या श्रेणीतील पुढच्या संख्याही शोधता येतात (२१,३४,५५...). जर मी या संख्यांच्या मापाचे चौरस बनवले, तर ते एकमेकांमध्ये पुढीलप्रमाणे बसवता येतात. या प्रत्येक चौरसमधून वक्ररेषा काढत गेल्यास आपल्याला एक सुंदर चित्र मिळते.





या नागमोडी वळणाला 'Fibonacci Spiral' असं म्हणतात. हा विशिष्ट आकार आपल्याला निसर्गामध्ये खूप ठिकाणी दिसतो. गोगलगायचे शंख, विविध आकाशगंगा, काही फुले, फळे, चक्रीवादळ, प्राण्यांच्या शेपट्या अशी भरपूर उदाहरणे आपल्याला Fibonacci Spiral च्या आकारात बनलेले दिसतील. फिबोनाकी श्रेणीतील संख्याही आपल्याला आजूबाजूला दिसतील. कोणत्याही फुलांच्या पाकळ्या २,३,५,८... अशा संख्येतच असतात. ६ पाकळ्यांचे फूल क्वचितच मिळेल. गुगलवर तुम्ही आणखी उदाहरणे पाहू शकता.

आवडली ना ही फिबोनाकी श्रेणी? आपण निसर्गाला सुंदर म्हणतो अन् गणिताला डोकेदुखी. पण निसर्गानेही स्वतःला सुंदर बनविण्यासाठी गणिताचा अभ्यास केलेला दिसतोय! शास्त्रज्ञांच्या मते, या आकारामुळे सजीवांची वाढ सोयिस्कर पद्धतीने होते. फुलांमध्ये जास्तीत जास्त बिया मावण्यासाठी हा आकार उपयुक्त ठरतो. फिबोनाकी श्रेणीमागील वैज्ञानिक कारण सांगता आले म्हणून या श्रेणीला महत्त्व आहे. अंकशास्त्रामध्येही आजूबाजूचे संबंध संगितले जातात. पण त्यामागे कोणतेही विज्ञान नसते.

कोडे क्र. ६: तुमच्याकडे ३ लीटर आणि ५ लीटर मापाची दोन भांडी आहेत. या भांड्यांवर कोणत्याही खुणा नाहीत. मला ४ लीटर पाण्याची आवश्यकता आहे. या दोनच भांड्यांचा वापर करून बरोबर ४ लीटर पाणी कसे मिळवाल?

आपले उत्तर (९४२३३९५०९७) या व्हॉटस्अपवर पाठवावे.

**कोडे क्र. ५ चे उत्तर :**

१) (९-८) x ४ x ६

२) यांचे २४ उत्तर बनत नाही

३) ६ x (? -३/४)

**बरोबर उत्तर देणारे गणितप्रेमी.**

१) प्रतिक्षा पाटील (इस्लामपूर)

२) प्रदीप माळी (पुणे)

३) विलास निंबोरकर (गडचिरोली)

# विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र. १०

**– उत्तम जोगदंड**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | | २ | | ३ | | | | |
| ४ | | | | | | | | | ५ |
| | | | | | | ६ | | | |
| | | ७ | | ८ | | | ९ | | |
| १० | ११ | | १२ | | | | | | |
| १३ | | | | | १४ | | | | १५ |
| | | | | | | | १६ | | |
| | | १७ | | १८ | | | | | |
| १९ | २० | | २१ | | | २२ | | | |
| | | | २३ | | | | | | |

**आडवे शब्द:**

२) १२व्या शतकातील थोर समाजसुधारक, यांनी लिंगायत धर्म स्थापन केला.

४) भारतीय लोकांचे पारंपरिक उत्सव

७) क्रांतिवीर जोतिबा फुले यांचा एक ग्रंथ

१०) चुंबकाच्या दोन ध्रुवांपैकी एक

१२) मस्तकाचा पुढील भाग

१३) छत्रपती शाहू महाराजांची नगरी

१४) आकाशात ढग दाटून येणे

१६) बसवेश्वरांच्या रचना

१९) जोतिराव फुले यांचे एक निष्ठावंत अनुयायी दिनकरराव *****

२२) जोतिराव फुले यांचे जन्मगाव

२३) विंचवाने डंख मारल्यावर हा लागतो

**उभे शब्द**

१) भारतातील एक वाळवंटी भाग. कच्छचे **

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेले एक वृत्तपत्र

३) झाडाला वेढून घेऊन वर चढणाऱ्या वनस्पतीचा एक प्रकार

४) जोतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या समाजाचे नाव

५) जोतिराव फुले यांच्या रचना

६) संपूर्ण शरीरावर याचे आच्छादन असते

८) वेदनेचा एक प्रकार

९) बसवेश्वर यांनी निर्माण केलेली संसदेसारखी व्यवस्था

११) प्राणी–मनुष्य प्रजातीमधील पुरुषी वर्गाचे नाव

१४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मस्थान

१५) वनस्पतींचा अन्ननिर्मिती करणारा भाग

१७) किटकाचा एक प्रकार, याची धाडदेखील पडते

१८) बसवेश्वरांच्या अनुयायांना दिले जाणारे शीर्षक

२०) मिठाईवर लावले जाणारे चांदीचे पातळ आवरण

२१) छातीत हा दाटला की श्वास घेणे कठीण होते

(उत्तर पुढील अंकात)

## विवेक–विज्ञान शब्दकोडे ९ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १सा | २वि | त्री | मा | ३ई | फु | ले | | | ४मे |
| | ज | | | ला | | | ५भं | व | री |
| ६मा | या | व | ७ती | | | ८प्र | | | को |
| | ल | | स्ता | | ९फा | ति | मा | | म |
| | क्ष्मी | | | | | भा | | | |
| १०स | | ११आ | नं | १२दी | गो | पा | ळ | जो | १३शी |
| रो | | | | प | | टी | | | ला |
| १४जि | जा | ऊ | | क | | १५ल | क्ष्मी | | डा |
| नी | | | १६ब | सं | ती | | | | व |
| | १७गौ | री | | धू | | १८बा | मा | | रे |



जोतीराव गोविंदराव फुले

(११ एप्रिल १८२७ – २८ नोव्हेंबर १८९०)

## विनम्र अभिवादन

महाराष्ट्राचे थोर विचारवंत, समाज सुधारक, भारत देशातील स्त्री–शिक्षणाचे प्रणेते, अस्पृश्यता–जातिभेदाविरोधात प्रखर लढा देणारे महामानव, लेखक, कवी जोतीराव गोविंदराव फुले (महात्मा फुले) यांचा जन्मदिन दिनांक ११ एप्रिल रोजी येत आहे. यांच्या कार्याने आणि विचाराने प्रभावित होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना आपले गुरु मानले होते. महाराष्ट्र कोणाचा, असा प्रश्न उपस्थित झाल्यास अगदी सहजपणे उत्तर येते, फुले–शाहू–आंबेडकरांचा! महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा एक नारा आहे,'फुले–शाहू–आंबेडकर, आम्ही सारे दाभोलकर'. अशा या महामानवांस महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका'चे विनम्र अभिवादन.

## अभिनंदन



डॉ. सौ. प्रतिभा पंकज वाणी यांनी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांच्यातर्फे मराठी विषयाच्या मानवता विद्याशाखेतून पी.एच.डी. ही पदवी प्राप्त केली त्यांच्या संशोधनाचा विषय –डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे वैचारिक लेखन : एक चिकित्सक अभ्यास विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे त्यांना पी.एच.डीच्या सर्वोत्कृष्ट संशोधन कार्याबद्दल मराठी, इतिहास व राज्यशास्त्र विषयासाठी असलेले सन २०२२ साठीचे डॉ. श्रीमती शरावती रामचंद्र शिरगांवकर सुवर्णपदक दि.१५ फेब्रुवारी, २०२३ रोजी विद्यापीठाच्या ७२ व्या दीक्षांत समारंभात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. त्याबद्दल त्याचे मनपूर्वक अभिनंदन

## एक आगळावेगळा विवाह सोहळा




गडचिरोली शहरातील सामाजिक कार्यकर्ते, सेवानिवृत्त शिक्षक तथा महा.अंनिसचे वैज्ञानिक जाणिवा प्रकल्पाचे राज्य सहकार्यवाह श्री. विलासजी निंबोरकर यांची मुलगी पुजा व राज्य पदाधिकारी हरिदास तम्मेवार यांचा मुलगा गिरीश यांचा विवाह इतर कोणताही विधी, कर्मकांड, डीजे, अक्षदा ह्या अनाठायी खर्चाला फाटा देत अगदी साध्या पद्धतीने महात्मा ज्योतिबा फुले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगेबाबा ह्या संतांच्या विचारांशी प्रेरित होऊन परिचय विवाह आज घडवून आणला. ह्या विवाहाची जनमाणसात स्तुती केली जात आहे. सदर लग्नसोहळ्याला महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे व राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार प्रामुख्याने उपस्थित होते.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष पहिले अंक सातवा ५ एप्रिल २०२३ (मासिक) पृष्ठसंख्या ४० किंमत रू. २०/-
Andhashradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 1 Issue 7 5th April 2023 (Monthly) Pages 40 Price Rs. 20/-

## महाराष्ट्र अंनिसच्या विज्ञान बोध वहिनी उपक्रम अंतर्गत ' फिरते थ्री डी नभांगण





इस्लामपूर येथे फिरते थ्री डी नभांगण कार्यक्रम पाहण्यासाठी सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षण अधिकारी मोहनराव गायकवाड सोबत विद्यार्थी, दत्ताजीराव पाटील, प्राचार्या अलकनंदा शिंदे आणि संजय बनसोडे



आधुनिक दुर्बिणीतून ग्रहांचे निरीक्षण करताना विद्यार्थीनी



नवी मुंबई येथे फिरते थ्री डी नभांगण उपक्रम



हसत खेळत विज्ञान कार्यक्रम सादर करताना भास्कर सदाकळे



आकाश निरिक्षण दाखवताना प्रा.डॉ.नितीन शिंदे

**Printed Book Post**

प्रेषक,

अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक

अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
द्वारा : प्रा. डॉ. नितीन शिंदे
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४०९.
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com

प्रति, ______________________

______________________

______________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.